# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Staff Council Meeting Register

## Review Meetings for Teaching, Learning and Evaluation process in the Institution

## Academic Session: 2017-2018

# 2017-2018 Academic Review Meetings with Staff Report-



Page No.:
Date: / /

## Staff Council Meeting Register

From Session → 2017 – 2018
2018 – 2019

प्रमाणित करण्यात येते या रजिस्टर मध्ये 1 ते 76 पर्यंत पृष्ठ असुन वरील रजिस्टर मध्ये Staff Council Meeting चे आयोजन करण्यात येणार असुन वरील रजिस्टर दुसऱ्या कार्याकरिता किंवा सभेकरीता उपयोगात आणले जाणार नाही. किंवा या रजिस्टर मधील पानांचा इतर कामाकरिता उपयोग केला जाणार नाही करीता। वरील रजिस्टर प्रमाणित करण्यात येत आहे.

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

# 2017-2018 Academic Review Meetings dated 16-6-17with Staff -Notice

Date: 16 06 17

## सूचना

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की प्राध्यापक परिषदेची सत्र 2017 – 2018 ची पहिली सभा – दिनांक 16 जून 2017 रोजी ठिक 11·30 वाजता प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली असून वरील सभेला सर्व प्राध्यापकांची उपस्थिती अनिवार्य आहे. याची नोंद घ्यावी.

### सभेचे विषय

① सत्र 2017-2018 करीता विभागांचे वितरण करणे.
② अभ्यासक्रम व परिक्षा पध्दती संदर्भात चर्चा करणे.
③ प्रवेशासंदर्भात चर्चा करणे.
④ NAAC SEMINAR संदर्भात जबाबदारीचे विभाजन करणे.
⑤ मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय।

SEAL

PRINCIPAL
Yashodha Girls Arts & Commerce College
Such Nagar, Nagpur-15

### सर्व सन्माननिय प्राध्यापक वर्गाच्या सह्या आणि नावे

| प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|
| ① Dr. Prakash S. Sonak | [signature] |
| ② Dr. Pramod G. Rating | [signature] |
| ③ Dr. M. D. Katre | [signature] |
| ④ S. S. Thool | [signature] |
| ⑤ R. B. Ghogre | R.B.Ghogre |
| ⑥ Anil Raut | [signature] |
| ⑦ Suryakant Kapshikar | [signature] |
| ⑧ R. L. Meshram | [signature] |
| ⑨ V. P. Hinge | VP Hinge |
| ⑩ V. S. Banka | [signature] |
| ⑪ | |
| ⑫ | |
| ⑬ | |
| ⑭ | |
| ⑮ | |
| ⑯ | |

# 2017-2018 Academic Review Meetings dated 16-6-17with Staff -Report

## सभेच्या अहवाल

Page No:
Date: 18 06 2017

दिनांक 16/06/2017 रोजी प्राध्यापक परिषदेची पहिली सभा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली त्यामध्ये ज्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली त्या सभेचा अहवाल खालील प्रमाणे आहे.

**मुद्दा क्र० १ :- सत्र 2017-2018 करिता विभागाचे वितरण करणे**

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना सत्र 2017-2018 मध्ये करावयाच्या कामाच्या संदर्भात नॅक आणि इतर महाविद्यालयाच्या सर्वांगीण विभागाच्या दृष्टीने प्रत्येक प्राध्यापकांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण करण्याव्यतिरिक्त विकासाच्या दृष्टीकोनातून इतर विभाग निहाय कामाचे वितरण प्रत्येक प्राध्यापकांकडे प्राचार्यांनी दिले त्यावर सर्व प्राध्यापकांनी आप आपली कामे समजून घेवून आम्ही आमच्याकडे दिलेल्या विभागाचे योग्य पद्धतीने कार्य करू असे प्राचार्यांना सर्वांनी आश्वासन दिले.

**मुद्दा क्र० २ :- अभ्यासक्रम व परिक्षा पद्धती संदर्भात चर्चा करणे**

सभेच्या अध्यक्षांनी सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की सत्र 2017-18 मध्ये बऱ्याच विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये बदल झालेले असून त्याची सर्व प्राध्यापकांनी योग्य माहिती एकत्रीत करून आणि विद्यापिठाच्या वेबसाईटवर जाऊन कोणी आपल्या विषयाचा अभ्यासक्रम बदललेला आहे. याची योग्य प्रकारे माहिती काढून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकविण्यास सुरुवात करावी अशी सूचना अध्यक्षांनी केली. त्यावर सर्वांनी त्याला होकार दिला.

*सभेच्या अध्यक्षांनी सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की या वर्षी ज्या 1st सेम आणि 2nd सेम पद्धतीने परिक्षा होणार आहेत. तेव्हा प्रत्येक प्राध्यापकांनी योग्य वेळेवर महाविद्यालयीन घटक चाचणी आणि सत्रांत परिक्षेच्या संदर्भात कार्यवाही करून तशी कार्यक्रमाची माहिती ज्या प्राध्यापकांकडे परीक्षा विभागाचे काम दिलेले आहे त्यांना लवकरात लवकर प्राचार्यांना द्यावी असे ठरविण्यात आले.

**मुद्दा क्र० ३ :- प्रवेशा संदर्भात चर्चा करणे**

सभेच्या अध्यक्षांनी सर्व महाविद्यालयातील प्राध्यापकांना

अधिक प्रमाणामध्ये होणे अत्यंत आवश्यक आहेत तेव्हा प्रत्येकाने अधिकाधिक प्रवेश कसे मिळविता येतील याकरिता प्रयत्न करणे आवश्यक आहेत. या मुद्द्यावर चर्चा करतांना प्राचार्यांनी असे सूचित केले की प्रत्येक शाळा आणि ज्युनियर कॉलेजमध्ये महाविद्यालयाला भेट्या लागल्यापूर्वी जाणे आवश्यक आहे. आणि त्यांच्या साह्या आपून फोन नंबरपरून विद्यार्थ्यांशी संपर्क करून प्रवेश जास्तीत जास्त मिळविणे हे या वर्षीचे एकमेक कार्यक्रम राहील असे प्राचार्यांनी सूचित केले तेव्हा सर्व प्राध्यापकांना त्यांच्या मार्गदर्शनाला होकार दिला.

**मुद्दा क्र ०४ :- NAAC SEMINAR संदर्भात जबाबदारीचे प्राध्यापकांना विभाजून देणे.**

प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना या वर्षीच्या नॅकशी संबंधीत कामे अभ्यासक्रमासोबतच जे काही कार्यक्रम त्या सर्व प्रत्येक वर्षीच्या त्याच वर्षी पूर्ण करणे आवश्यक आहेत कारण सर्व माहिती ऑनलाईन सबमीट करणे आवश्यक असते तेव्हा प्रत्येक प्राध्यापकांनी आपल्या विभागाचे सर्व रेकार्ड वेळेवर सबमिट करावे त्याची संपूर्ण जबाबदारी IQAC समन्वयकांची राहील.

प्राचार्यांनी या वर्षी सेमीनार कोणकोणते विभाग घेणार याचा आढावा घेतला त्यावर त्यांनी कमीत कमी तीन विभागाचे सेमीनार व्हायला हवे असे सूचित करून ज्यांना आपल्या विभागातर्फे सेमीनारचे आयोजन करायचे आहे त्यांनी लवकरात लवकर कामाची सुरुवात करावी अशी सूचना करून मला आठ दिवसात याची लेखी माहिती कळवावी असे सूचित केले.

**मुद्दा क्र० ५ :- अध्यक्षांच्या परवानगीने येणारे वेळेवरचे विषय.**

यामध्ये कोणतेही विषय न आल्याने सभा समाप्तीची अध्यक्षांनी घोषणा केली.

समन्वयक
(स्टॅफ कॉन्सील)

SEAL

Principal
[illegible] Girls Arts & Commerce College, [illegible] Nagar, Nagpur-15

# 2017-2018 Academic Review Meetings dated 11-8-17with Staff -Notice

Date: 10/08/17

## सूचना

महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की उद्या दिनांक 11/08/2017 रोजी "Staff Council" ची सभा आयोजित करण्यात आलेली असून वरील सभेला सर्व प्राध्यापकांची उपस्थिती अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी.

टिप :- ① सभा ही प्राचार्य कक्षामध्ये 12.00 वाजता होईल
② प्राचार्य हे या सभेचे अध्यक्ष राहणार आहेत.
③ सभेमध्ये महाविद्यालयाशी संबंधित मुद्द्यावर चर्चा

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

समन्वयक
[illegible] कार्यालय

सभेचे विषय
1. अभ्यासक्रमातील झालेल्या बदलावर चर्चा
2. प्रवेश संदर्भात झालेल्या प्रवेशावर विषयवार चर्चा
3. नियमित वर्ग सुरू करण्याबाबत चर्चा
4. मा. अध्यक्षाच्या परवानगीने येणाऱ्या अन्य विषयावर चर्चा

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्गाच्या सह्या.

| प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|
| 1. Dr. Pramod G. Fating | [signature] |
| 2. Dr. M. D. Katre | [signature] |
| 3. S S Thool | [signature] |
| 4. Dr. P. S. Sonak | [signature] |
| 5. R. B. Ghogre | R. B. Ghogre |
| 6. S S Thool | [signature] |
| 7. Amol Raut | [signature] |
| 8. Suryakant Wagh[illegible] | [signature] |
| 9. R. L. Meshram | RMeshr |
| 10. V. P. Hi[illegible] | [signature] |
| 11. V. S. Bank | VSBank |
| 12. | |
| 13. | |
| 14. | |
| 15. | |
| 16. | |

# 2017-2018 Academic Review Meetings dated 11-8-17with Staff -Report

## अहवाल

Date 12.08.2017

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची परिषदेची बैठक प्राचार्य कक्षामध्ये दिनांक 11/08/2017 रोजी प्राचार्यांच्या अध्यक्षतेमध्ये आयोजीत करण्यात आली त्या सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली असुन प्राचार्यांनी वरील सर्व विषयावर माहिती दिली त्या सभेच्या अहवाल पुढील प्रमाणे

**विषय क्र०१ :- अभ्यासक्रमातील झालेल्या बदलावर चर्चा करणे**

सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद सांबारे यांनी सर्व उपस्थित असलेल्या प्राध्यापकांना अशी सूचना केली की सर्वच विषयाच्या प्राध्यापकांनी त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये काय बदल झाला किंवा नाही त्याची विद्यापिठाच्या अभ्यासक्रम गोळा करावा वरील सत्रामध्ये विद्यार्थ्यांना शिकवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाची इंत्थंभुत माहिती प्राचार्यांकडे आज दिनांक पासुन आठ दिवसाच्या आत द्यावी. तेव्हा सर्व प्राध्यापकांनी याला मान्यता दिली.

**विषय क्र०२ :- प्रवेशासंदर्भात झालेल्या प्रवेशावर विषयवार चर्चा**

सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी झालेल्या प्रवेशाबद्दल सर्वांचे कौतुक केले परंतु अजूनही आपल्याला प्रवेशाची आवश्यकता आहे असे त्यांनी सुचित केले कारण आपल्या महाविद्यालयात जे विषय शिकविले जातात त्या सर्वच विषयांना कमीत कमी 24 प्रवेशाची आवश्यकता असते तेव्हाच तो विषय आणि विभाग सुरु राहू शकतो. तेव्हा झालेल्या प्रवेशामध्ये अजुन कोणत्या विषयाचे प्रवेश पूर्ण झालेले नाहीत, त्यांची माहिती क्लर्क कडून घेवून उर्वरित प्रवेश त्या विषयामध्ये कसे करता येतील यावर विचारमंथन करण्यात येवून प्रत्येक प्राध्यापकांनी प्रत्येकी दोन ते तीन प्रवेश आणण्याची जबाबदारी देण्यात आली त्यावर सर्व प्राध्यापकांनी ते मान्य केले.

**विषय क्र०३ :- नियमित वर्ग सुरु करणेबाबत चर्चा**

नियमित वर्ग सुरु करणेसंदर्भात अध्यक्षांनी प्राध्यापकांना सांगितले 20/8/2017 किंवा तत्पूर्वी टाईमटेबल तयार करण्याची

जबाबदारी ठरल्याप्रमाणे ज्या प्राध्यापकांकडे दिलेली आहे. त्यांनी ते लवकरात लवकर तयार करून नोटीस बोर्ड वर लावावे अशी सूचना करून दिनांक 15/08/2017 पासून नियमित वर्ग सुरू करण्याच्या सूचना सर्व प्राध्यापकांना दिली प्रत्येक प्राध्यापकांनी कमीत कमी 15 विद्यार्थिनींना फोन करावे आणि त्यांना सूचित करावे कि दिनांक 15/8/2017 पासून नियमित वर्ग सुरू होणार आणि त्यानुसार सर्वच प्राध्यापकांनी आपले वर्ग सुरू करावे अशी सूचना केली असता ती सर्व प्राध्यापकांनी मान्य केली.

<u>विषय क्र.04 :⇒ अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयामध्ये</u> डॉ. प्रकाश सोनक यांनी असा प्रश्न विचारला की घटक चाचणी परिक्षा सप्टेंबर महिन्यामध्ये केव्हा घ्यायची कारण त्यानुसार सर्व प्राध्यापकांचे प्रथम युनिट शिकवून होणे आवश्यक आहे त्यावर प्राचार्य अध्यक्ष सभेमध्ये त्यांनी सप्टेंबर 15 नंतर केव्हाही परिक्षा घ्याव्या असे सूचविले ते सर्व प्राध्यापकांनी मान्य केले.

सर्व मुद्दे संपल्यामुळे अध्यक्षांच्या आदेशानुसार सभा संपली असे जाहिर करण्यात आले.

समन्वयक
[स्टाफ कौन्सिल]

SEAL

Principal
Ashok Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15

# 2017-2018 Academic Review Meetings dated 16-12-17with Staff -Notice

## सूचना

Date 15 12 2017

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की दिनांक 16|12|2017 रोजी प्राचार्य कक्षामध्ये सकाळी 11.00 वाजता प्राचार्यांच्या अध्यक्षतेमध्ये सभेचे आयोजन करण्यात आलेले असून वरील सभेला सर्व प्राध्यापकांनी उपस्थित राहावे.

वरील सभेमध्ये खालील विषयावर चर्चा होणार आहे.

1. विद्यापिठाच्या परिक्षेवर चर्चा करणे
2. अभ्यासक्रम शिकवून झाला किंवा नाही यावर चर्चा
3. सुट्यांच्या काळामध्ये राहिलेल्या अभ्यासक्रम पूर्ण करणे.
4. महाविद्यालय विद्यापिठाचे सेंटरवर चर्चा करणे
5. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा

SEAL

समन्वयक
(स्टाफ कौन्सील)

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्गाच्या सह्या

| | प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|---|
| 1 | Dr. M. D. Katre | |
| 2 | S S Tool | |
| 3 | R. B. Ghogre | R.B.Ghogre |
| 4 | Dr. Pramod G. Lohiy | |
| 5 | Amol Raut | |
| 6 | Suryakant Kapshikar | |
| 7 | R. L. Meshram | |
| 8 | V. P. Hinge | |
| 9 | V. S. Banka | |
| 10 | | |
| 11 | | |
| 12 | | |
| 13 | | |
| 14 | | |
| 15 | | |

# 2017-2018 Academic Review Meetings dated 16-12-17with Staff -Report

(13)

Page No.:
Date: 17/12/2017

## सभेचा अहवाल

दिनांक 15/12/2017 ला झालेल्या प्राचार्य कक्षातील प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची विशेष सभा घेण्यात आली त्या सभेतील झालेल्या निर्णयाचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**विषय क्र. ०१ :- विद्यापीठाच्या परिक्षेवर चर्चा करणे**

वरील विषयाच्या अनुषंगाने प्राचार्य आणि वरील सभेचे अध्यक्ष यांनी सर्व प्राध्यापकांना विद्यापीठाच्या परिक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले. प्राध्यापकांनी मुलींना पेपरसेट समजवून देण्यास सांगितले प्रश्नाची उत्तरे कशी लिहायची यावर प्राध्यापकांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करावे अशा सूचना केल्यात प्रत्येक विद्यार्थिनींचे असायमेंट चे मार्क साईट ओपन होतात असावे त्यात एकाही विद्यार्थिनीचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी जेणेकरून प्रत्येक विषयाच्या निकाल विद्यापीठ स्तरावर चांगला लागावा आणि याची संपूर्ण जबाबदारी ही प्राध्यापकांची राहील अशी सूचना सर्व प्राध्यापकांना केली त्यावर सर्वच प्राध्यापकांनी आम्ही आपल्या विषयाच्या निकालाकरिता प्रयत्न करू असे सांगितले

**विषय क्र. ०२ :- अभ्यासक्रम शिकवून झाला किंवा नाही यावर चर्चा**

सभेचे अध्यक्ष आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी प्रत्येक विभागाच्या प्राध्यापकांकडून त्यांच्या शिकवून झालेल्या अभ्यासक्रमाच्या आढावा घेतला त्यावर सर्वच विभागाच्या विभाग प्रमुखांनी आपआपल्या विषयाची माहिती दिली आणि शिल्लक राहिलेल्या अभ्यासक्रमाची देखील माहिती प्रत्येक प्राध्यापकाने दिली त्यावर अध्यक्षांनी अशी सूचना केली की आपण आपला अभ्यासक्रम लवकरात लवकर विद्यार्थ्यांना लवकर लवकर देता येईल या पद्धतीने शिकवून विद्यार्थिनींना परिक्षेच्या अभ्यासाकरिता लवकरात लवकर मोकळे करावे. तसेच सर्वच प्राध्यापकांनी आपला अभ्यासक्रम लवकरात लवकर करण्याचे मान्य केले.

**विषय क्र० ३ :- सुट्ट्यांच्या काळामध्ये राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे.**

सभेमध्ये अध्यक्षांनी अशी सूचना केली की ज्या प्राध्यापकांच्या विषयाचे अभ्यासक्रम पूर्ण झालेले नाहीत अशा प्राध्यापकांनी आपला अभ्यासक्रम लवकरात लवकर पूर्ण करावा अन्यथा आपल्याला सुट्यांच्या काळामध्ये राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करावा लागेल याची दक्षता घ्यावी. तेव्हा ज्या प्राध्यापकांचा अभ्यासक्रम थोडाफार शिल्लक आहे. अशा प्राध्यापकांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण करण्याची हमी अध्यक्षांना दिली.

**विषय क्र० ४ :- महाविद्यालयाला विद्यापीठाचे मिळालेले सेंटर यावर चर्चा करणे**

सभेमध्ये प्राचार्य आणि अध्यक्ष यांनी अशी सूचना केली की महाविद्यालयाला विद्यापीठाने परिक्षेचे सेंटर दिलेले आहे, तेव्हा ही सर्वांची जबाबदारी आहे की आपल्या सेंटरवर कोणताही अनुचित प्रकार होऊ नये. तेव्हा ज्यांच्याकडे या परिक्षेची जबाबदारी दिलेली आहे त्यांनी आपल्या सोयीनुसार कार्यक्रमाची आखणी करावी. आणि प्रत्येक प्राध्यापकांच्या इनव्हीजीलेटर म्हणून कामे द्यावीत आणि प्रत्येक प्राध्यापकांना अशी विनंती करण्यात येते की विद्यापीठ परिक्षेच्या कामात कोणीही टाळाटाळ करू नये सर्व प्राध्यापकांनी याकामाकरीता होकार देवून केव्हाही आम्ही मदत करण्यास तयार आहोत. असे सांगितले

**विषय क्र० ५ :- अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय**

अध्यक्षांच्या परवानगीने कोणीही प्रश्न विचारले नाही तेव्हा अध्यक्षांनी सभा संपली असे जाहिर केले.

अध्यक्ष
(स्टाफ कौन्सील)

SEAL

Principal
Sahodra Girls Arts & Commerce
College, Shah Nagar, Nagpur-15.

# 2017-2018 Academic Review Meetings dated 28-4-18 with Staff -Notice

(15)

Page No.:
Date: 26.04.2018

## सूचना

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की दिनांक 28/4/2018 रोजी Staff Council & IQAC Meeting" चे आयोजन प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी 12.00 वाजता आयोजन करण्यात आलेले आहे. तेव्हा प्राध्यापकांना वर्षभर दिलेल्या कामाचा आढावा वरील सभेमध्ये घेण्यात येणार आहे करिता सर्व प्राध्यापकांनी वेळेवर उपस्थित राहावे.

दिनांक 28/04/2018 च्या सभेतील विषय

1. सुट्यांच्या काळातील प्राध्यापकांची कामे.
2. पुढील वर्षाच्या प्रवेशाचे नियोजन करणे.
3. निकाल लागताच सर्व प्राध्यापकांनी महाविद्यालयात येणे.
4. बँक संदर्भात वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेणे.
5. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय

SEAL

समन्वयक
[स्टाफ कौन्सील]

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांच्या सह्या

| प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|
| 1 | |
| 2 R.B. Ghogre | R.B.Ghogre |
| 3 Dr. Pramod G. Fating | GFating |
| 4 Dr. Prakash S. Sonak | [illegible] |
| 5 Dr. M. D. Katre | [illegible] |
| 6 S. S. Thool | [illegible] |
| 7 Amol Raut | [illegible] |
| 8 | |
| 9 S. S. Thool | [illegible] |
| 10 Surpahar Kapshikar | [illegible] |
| 11 R.L. Meshram | RMeshr |
| 12 V. P. Hinge | VPHinge |
| 13 V. S. Banke | VSBanke |

# 2017-2018 Academic Review Meetings dated 28-4-18with Staff -Report

## सभेच्या अहवाल

Date: 30/04/2018

दिनांक 28/4/2018 रोजी प्राध्यापक परिषदेची सभा प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. पुढील सभेमध्ये खालील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**विषय क्र. 1 :- सुट्यांच्या काळातील प्राध्यापकांची कामे**

सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की दिनांक 30/4/2018 हा शेवटचा दिवस असून दिनांक 1/5/2018 पासून प्राध्यापकांना सुट्या लागत आहेत. या सुट्यापूर्वी आपणास वर्षभर जे काम दिलेले होते ते पूर्ण करून कार्यालयाकडे किंवा संबंधित व्यक्तीकडे द्यावेत जेणेकरून ज्या काही त्रुटी असतील त्या संस्थेला कळेल. पुढील सूचना प्राचार्यांनी अशी केली की कोणीही आपल्या कामाचे क्षेत्र सोडत असल्यास महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्यांकडे त्याची माहिती असावी तेव्हा याची आपण दक्षता घ्यावी. सत्र 2018-2019 मध्ये आपल्या महाविद्यालयाकरिता ज्या प्रवेशाची अत्यंत आवश्यकता असते ती करण्याची जबाबदारी ही प्रत्येक प्राध्यापकांची असून त्याचे नियोजन या सुट्यामधील काही दिवसात आपण करावे जेणेकरून आपणास पुढील वर्षी प्रवेशाची कमतरता राहणार नाही. त्यावर सर्व प्राध्यापकांनी सुट्यांच्या काळामध्ये आम्ही प्रवेशाचे कार्य पूर्ण करू असे सर्व प्राध्यापकांनी मान्य केले.

**विषय क्र. 2 :- पुढील वर्षाच्या प्रवेशाचे नियोजन करणे**

अध्यक्षांनी विषय क्र. 1 मधील वरील विषयाला धरून या वर्षीच्या सुट्यांच्या काळामध्येच आपण हे काम पूर्ण करावे अशी सूचना केली. परंतु अध्यक्षांनी वरील प्रवेशाची पूर्तता करण्याची जबाबदारी महाविद्यालयामध्ये एक प्रवेश समिती नेमून दिली आणि वरील समितीला असे नियोजन करण्याचे सुचविले. संपूर्ण सत्राचे प्रवेशाच्या तारखेपर्यंत आणि नंतर देखील कार्य या समितीद्वारे पूर्ण करण्यात येईल. अशी सूचना अध्यक्षांनी देऊन सर्व प्राध्यापकांनी प्रवेशाशी संबंधित सर्व कार्य वरील समितीच्या मार्फत करावे अशी सूचना केली. त्यावर सर्व प्राध्यापकांनी या सूचनेला मान्यता दिली.

**विषय क्र०३ :- निकाल लागताच सर्व प्राध्यापकांनी महाविद्यालयात येणे.**

सभेच्या अध्यक्षांनी सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की कनिष्ठ महाविद्यालयाचे आणि S.S.C. चे निकाल लागल्यानंतर आपण सर्वांना महाविद्यालयामध्ये येणे आवश्यक आहे कारण की प्रवेशाची प्रक्रीया आपणांस कमीत कमी दोन महिने राबवायची असते. तेव्हा कनिष्ठ महाविद्यालयांना आणि शाळांना भेटी द्यावयाच्या असतात. तेव्हा ही आपली जबाबदारी समजून आपण महाविद्यालयामध्ये येऊन पूर्ण करणे आवश्यक आहे. कारण आपल्या विषयाकरीता प्रवेश घ्यावा हे देखील विद्यार्थिनींना समजवून सांगावे आवश्यक असते. तेव्हाच आपल्या विषयाचे प्रवेश पूर्ण होतील तेव्हा हे आपले कर्तव्य समजून आपण निकाल लागताच महाविद्यालयात यावे यावर सर्व प्राध्यापकांनी होकार देऊन हे आपलेच काम आहे असे मान्य केले.

**विषय क्र० ४ :- नॅक संदर्भात वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेणे**

सभेच्या अध्यक्षांनी सत्राच्या सुरुवातीला नॅक संदर्भातील प्रत्येक प्राध्यापकांना वाटून दिलेल्या कामाचा आढावा घेतला आणि त्यावर प्रत्येक प्राध्यापकांकडून माहिती घेतली असता सर्व प्राध्यापकांनी माहिती एकत्रित केलेली असून काही माहिती मिळणे शिल्लक असल्याने ती माहिती आणि जे काही विभागानुसार वाटून दिलेले काम पूर्ण करण्याची हमी दिली. सर्वच माहिती ही पुढील आठ दिवसामध्ये गोळा करावी आणि ती कार्यालयास सादर करावी अशी सूचना देण्यात आली.

**विषय क्र० ५ :- अध्यक्षांच्या परवानगीने येणारे वेळेवर विषय.**

वेळेवर येणारे विषय नसल्यामुळे अध्यक्षांनी सभा संपली असे जाहिर केले.

[signature]
(प्रा. ... समन्वयक ... कार्यालय)

SEAL

[signature]
Principal
Mahila Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

# Yashoda Girls’ Arts & Commerce College, Nagpur

## Staff Council Meeting Register

## Review Meetings for Teaching, Learning and Evaluation process in the Institution

## Academic Session: 2018-2019

# 2018-2019 Academic Review Meetings dated 16-6-18with Staff -Notice

Page No.:
Date 16/06/2018

## सूचना

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की उन्हाळी सुट्ट्या काळ संपलेल्या असल्याने आज आपण महाविद्यालयामध्ये प्रथम दिवसानिमित्य आणि संपूर्ण वर्षभर आपणांस काय कार्यक्रम राबवायचे आहेत तेव्हा आज दिनांक 16/06/2018 रोजी प्राचार्य यांच्या कक्षामध्ये प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली प्राध्यापक परिषदेच्या सभेचे आयोजन करण्यात आलेले असून वरील सभा ठिक 12 वाजता होईल करीता सर्व प्राध्यापकांची उपस्थिती आवश्यक आहे. याची नोंद घ्यावी.

(signature)
समन्वयक
(स्टाफ कौन्सील)

SEAL

(signature)
Principal
...Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15

**प्राध्यापक परिषदेच्या सभेतील विषय :-**

1. सत्र 2018 – 2019 करीता प्राध्यापकांना देण्यात येणारी जबाबदारी यावर चर्चा करणे.
2. विद्यार्थिनींच्या प्रवेशावर चर्चा करणे
3. नॅक आणि सेमिनार व रिसर्च प्रोजेक्टवर चर्चा करणे.
4. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**सभेकरीता उपस्थित असलेल्या सर्व प्राध्यापकांच्या सह्या आणि नावे**

| | प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|---|
| 1 | आर. बी. घोगरे | R.B.Ghogre |
| 2 | S S Thool | (signature) |
| 3 | Amol Raut | (signature) |
| 4 | Suryakant Kapshikar | (signature) |
| 5 | A.L. Meshram | Aleshy |
| 6 | V. P. Hinge | VPHinge |
| 7 | R. S. Banka | RSBank |
| 8 | | |
| 9 | | |
| 10 | | |
| 11 | | |
| 12 | | |
| 13 | | |
| 14 | | |

# 2018-2019 Academic Review Meetings dated 16-6-18with Staff -Report

## सभेचे इतिवृत्त [अहवाल]

Page No.:
Date: 18.06.2018

दिनांक 16/6/2018 रोजी प्राध्यापक परिषदेची सभा प्राचार्य यांच्या कक्षामध्ये घेण्यात आली वरील सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

**विषय क्र. ०१ :- सत्र 2018-2019 मध्ये प्राध्यापकांना देण्यात येणारी जबाबदारी यावर चर्चा**

सभेचे अध्यक्ष आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी वरील विषयाच्या अनुषंगाने सर्व प्राध्यापकांना कोणकोणती कामे या वर्षी आपल्या विभागाच्या व्यतिरिक्त करावयाची आहेत. त्याबद्दल सर्वच प्राध्यापकांकडे वर्षभर आपल्याला कायकाय महाविद्यालयाच्या विकासाच्या दृष्टीने कामे करावयाची आहेत. त्याची प्रत्येक प्राध्यापकांना जबाबदारी प्राध्यापकांना प्राचार्य यांनी दिली. आणि असे सुचित केले की दिलेल्या कार्याचे प्राचार्य यांना वेळोवेळी अपडेट देण्याची जबाबदारी ही प्रत्येक प्राध्यापकांची राहील असे सुचित केले त्याला सर्व प्राध्यापकांनी मान्य केले.

**विषय क्र. २ :- विद्यार्थिनींच्या प्रवेशावर चर्चा करणे.**

वरील सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यार्थिनींच्या प्रवेशाबद्दल सर्व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले यामध्ये त्यांनी असे सुचविले की आपले महिला महाविद्यालय आहे. तेव्हा मुलींचे प्रवेश मिळणे फार कठीण असते. आपण आपल्या महाविद्यालयात मुलांना प्रवेश देवू शकत नाही तेव्हा अशा देखील काही विद्यार्थिनी असू शकतात की त्यांना आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घ्यावयाचा नसतो. परंतु आपण त्यांना समजून देणे आपल्या महाविद्यालयाचे वैशिष्ट्य काय आहे. निकाल कसा आहे. कोणकोणते वर्षभर आपण कार्यक्रम घेतो. विद्यार्थिनींच्या विकासाकरीता आपण कोणत्या योजना राबवतो यांची संपूर्ण माहिती जर आपण प्राध्यापकांनी त्या विद्यार्थिनींना दिल्यास आपली आपणास प्रवेश मिळणे कठिन जाणार नाही. अशी सुचना अध्यक्षांनी सर्व प्राध्यापकांना केली त्यावर सर्व प्राध्यापकांनी अशी हमी दिली की आम्ही अधिकाधिक प्रवेश करण्याचे प्रयत्न करून महाविद्यालयाची संख्या वाढवू. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र० ३ :- नॅक, सेमिनार आणि रिसर्च प्रोजेक्टवर चर्चा करणे**

सभेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की त्यांच्या सत्रामध्ये ज्या विभागाला नॅक करीता आवश्यक असणारे सेमीनार आयोजित करावयाचे आहेत त्यांनी आपल्या विभागाद्वारे प्राचार्यांना आपले सेमीनार बद्दलची माहिती लवकरात लवकर सादर करावी. कमीत कमी तीन ते चार विभागाद्वारे यावर्षी सेमीनार चे आयोजन होणे आवश्यक आहे. सोबतच ज्या विभागाच्या प्राध्यापकांना मायनर आणि मेजर रिसर्च प्रोजेक्ट यु.जी.सी. कडे सबमीट करावयाचे आहे त्यांनी देखील आपले तयार केलेले प्रोजेक्ट लवकरात लवकर प्राचार्यांकडे सबमिट करावे. यावर प्राध्यापकांनी लवकरात लवकर आपल्याकडे प्रोजेक्ट बद्दल फाईल देण्यात येईल असे सूचविले.

**विषय क्र० ४ :- मा० अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय**

वरील विषयाच्या संदर्भात डॉ० के० जी० मेश्राम यांनी असा प्रश्न विचारला की या वर्षी कॉमर्स च्या प्रवेशाकरीता सर्वच प्राध्यापकांनी मदत करावी. त्यावर अध्यक्षांनी अशी सूचना केली की आपल्याला प्रवेश महत्वाचे आहेत मग ते बी.ए. चे असोत किंवा B.Com चे. सर्वच प्रवेशाकरिता सर्वच प्राध्यापकांनी आपल्या स्तरावर पूर्णपणे मदत करण्याचे जाहीर केले. तेव्हा सर्वच प्राध्यापकांचा सूर एकच होता की सर्व मिळून आपण ज्युनियर आणि सिनीयर कॉलेजच्या प्रवेशाकरीता होईल तितकी मेहनत घेवू.

सभेतील विषय संपल्यामुळे अध्यक्षांनी सभा संपली असे जाहीर केले.

(स्वाक्षरी)
सभा अध्यक्ष
प्राचार्य कार्यालय

SEAL

(स्वाक्षरी)
Principal
Ashoka Girls Arts & Commerce
College, Bush Nagar, Nagpur-15.

# 2018-2019 Academic Review Meetings dated 11-8-18with Staff -Notice

(23)

Page No.:
Date 09/08/2018

## सूचना

सर्व प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की दिनांक 11/08/2018 शनिवार रोजी प्राध्यापक परिषदेची सर्वसाधारण सभेचे आयोजन महाविद्यालयामध्ये प्राचार्य यांच्या कक्षामध्ये सकाळी 11.30 वाजता प्राचार्यांच्या अध्यक्षतेमध्ये करण्यात आलेले असुन काही महत्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात येणार असुन वरील सभेला सर्व प्राध्यापकांची उपस्थिती आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

प्राध्यापक परिषदेच्या सभेतील विषय.

1. अभ्यासक्रमावर चर्चा करणे
2. प्रवेशासंदर्भात चर्चा करणे
3. नियमीत शिकवणी वर्गावर चर्चा करणे.
4. प्रत्येक विभागाच्या अभ्यास मंडळाच्या कार्यक्रमावर चर्चा करणे
5. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

(Signature)
समन्वयक
[स्टाफ कौन्सील]

SEAL

(Signature)
Principal
Chahoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

सभेला उपस्थित असणाऱ्या सर्व प्राध्यापक वर्गाची नावे व स्वाक्षरी.

| प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|
| 1. Suryakant Kapshikar | (Signature) |
| 2. राजेश घोगरे | R.R.Ghogare |
| 3. | |
| 4. R.L. Meshram | RMesh |
| 5. Amol Raut | (Signature) |
| S. S. Tikole | (Signature) |
| 6. | |
| 7. V.P. Hirye | VP Hirye |
| 8. V.S. Bank | VSBank |
| 9. | |
| 10. | |
| 11. | |
| 12. | |
| 13. | |
| 14. | |

# 2018-2019 Academic Review Meetings dated 11-8-18with Staff -Report

## सभेचे इतिवृत्त [अहवाल]

Page No.:
Date 13 08 2018

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची प्राचार्य आणि सभेचे अध्यक्ष डॉ. शरद सांवारे यांच्या उपस्थितीमध्ये प्राचार्य कक्षामध्ये झालेल्या दिनांक 11/08/2018 च्या सभेतील विषयाचे इतिवृत्त पुढील प्रमाणे आहे.

**विषय क्र. १ :- अभ्यासक्रमावर चर्चा करणे**

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना प्राचार्यांनी सूचित केले की सत्र 2018- आणि 2019 च्या अभ्यासक्रमामध्ये काही बदल झाला असल्यास विद्यापीठाच्या साईटवरून सर्वांनी तपासून घ्यावे आणि काही बदल असल्यास तो अभ्यासक्रम काढून नविन अभ्यासक्रम काय बदललेला आहे ते प्राचार्यांना 7 दिवसाचे आत सादर करावे. जेणे करून चुकीचा अभ्यासक्रम शिकविला जाणार नाही याची काळजी घेणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य आहे. तेव्हा कोणतीही चूक होऊ नये अशी आपल्याकडून अपेक्षा आहे. तेव्हा सर्व प्राध्यापकांनी अभ्यासक्रमामध्ये काही बदल असल्यास आपल्या लक्षात आणून दिले पाहिजे आणि नंतरच शिकविण्यास सुरूवात करण्यात येईल असे सांगितले.

**विषय क्र. २ :- प्रवेशासंदर्भात चर्चा करणे**

सभेमध्ये प्राचार्यांनी वरील विषयावर सविस्तर माहिती दिली. महाविद्यालयामध्ये आतापर्यंत एकूण 11 वी 12, बी.ए, बि.कॉम मध्ये झालेल्या प्रवेशासंदर्भात आज किती प्रवेश झालेले आहेत याची माहिती प्राध्यापकांना दिली असून विद्यापीठाची तारीख 9 सप्टेंबर प्रवेशाची असल्यामुळे आपल्याला अजून एकूण प्रवेश म्हणजेच आपल्याकडे असलेल्या क्षमतेपेक्षा 70% क्षमता प्रवेश झालेले आहेत आणि अजून 30% प्रवेश होणे शिल्लक आहेत. तेव्हा प्रत्येक प्राध्यापकांनी आपले शिकवणी वर्ग पूर्ण झाल्यानंतर प्रवेशाकरीता प्रयत्न करणे अतिशय आवश्यक आहे. प्रत्येकाने अजून 9 प्रवेश आणल्यास आपण आपल्या क्षमतेला पूर्ण करू शकू त्यावर प्राध्यापकांनी होकार देऊन आम्ही आमच्या तासानंतर पूर्णपणे प्रयत्न करून आपण तेवढे प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करू असे प्राचार्यांना आश्वासन दिले.

**विषय क्र०३ :- नियमित शिकवणी वर्गावर चर्चा करणे**

प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की या सत्राचे टाईम टेबल तयार करून नोटीस बोर्डवर आणि स्टाफरूममध्ये लावलेले आहेत. प्रत्येक प्राध्यापकाला एक कॉपी दिलेली असून त्यांनी आपल्या विषयाची विद्यार्थिनींची यादी प्रवेश झालेली संख्या घेऊन विद्यार्थिनींना वर्ग नियमित सुरू झाल्याचे कळवून आपले वर्ग 15/08/2018 पासून सुरू करावे. कारण महाविद्यालय सुरू होऊन दिड ते दोन महिने झालेले आहेत जवळपास प्रवेश क्षमता देखील आहे. तेव्हा आपण आपले नियमित वर्ग सुरू करावे अशी सूचना केली तेव्हा सर्व प्राध्यापकांनी त्याला मान्य करून 15 तारखेपासून नियमित वर्ग घेऊ असे सांगितले.

**विषय क्र०४ :- प्रत्येक विभागाच्या अभ्यास मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमावर चर्चा करणे :**

सभेचे अध्यक्ष आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सर्व विषयाच्या विभाग प्रमुखांना असे सूचित केले की आपण आपल्या अभ्यास मंडळाचे उद्घाटन 15 सप्टेंबर पूर्वी पूर्ण करावे त्यानंतर वरील कार्यक्रमाची परवानगी दिली जाणार नाही तसेच कोणताही वेस्ट म्हणून कोणता कार्यक्रम त्यावर सर्वप्रथम विभाग प्रमुखांनी प्राचार्यांशी चर्चा करावी आणि दोन कार्यक्रम किंवा त्यापेक्षा अधिक कार्यक्रम एकाच दिवशी घेण्याची परवानगी दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी तेव्हा याला सर्वांनी मान्यता दिली.

**विषय क्र०५ :- अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय**

अध्यक्षांच्या परवानगीने कोणीही कोणताच प्रश्न विचारला नाही याला 10 मिनिटांचा वेळ देण्यात आला तसा अध्यक्षांनी सर्वांना परत विचारले की कोणाच्या काही सूचना असल्यास कळवावे कोणाचीही कोणतीच सूचना नसल्यामुळे सभा समाप्त करण्यात आली.

Principal
Girls Arts & Commerce College,Bush Nagar,Nagpur-15

# 2018-2019 Academic Review Meetings dated 20-12-18with Staff -Notice

Page No: 27
Date: 18.12.2018

## "सुचना"

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की दिनांक 20/12/2018 गुरुवार रोजी प्राध्यापक परीषदेची सभा प्राचार्य कक्षामध्ये दुपारी 12-30 वाजता प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली असून सर्व प्राध्यापकांनी वरील सभेला हजर राहणे आवश्यक आहे करिता याची नोंद घ्यावी.

**सभेतील विषय**

1. विद्यापीठ परिक्षेच्या दृष्टीने चर्चा करणे.
2. अभ्यासक्रमावर माहिती घेणे.
3. शैक्षणिक सहलीवर चर्चा करणे.
4. महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम घेणेबाबत चर्चा.
5. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

प्रा. [signature]
समन्वयक
[स्टाफ कौन्सील]

SEAL

[signature]
Principal
Sahodaya Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15

**कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या सह्या.**

| | प्राध्यापकांचे नावे | स्वाक्षरी |
|---|---|---|
| 1 | R.B. Ghogre | R.B.Ghogre |
| 2 | Amol Raut | [signature] |
| 3 | R.L. Meshram | [signature] |
| 4 | Suryakant Kapsikar | [signature] |
| 5 | | |
| 6 | S. S. Thool | [signature] |
| 7 | V.P. Hinge | VP Hinge |
| 8 | Y.S. Barkar | [signature] |
| 9 | | |
| 10 | | |
| 11 | | |
| 12 | | |
| 13 | | |
| 14 | | |
| 15 | | |

# 2018-2019 Academic Review Meetings dated 20-12-18with Staff -



## सभेचे इतिवृत्त [अहवाल]

Page No.
Date: 20/12/2018

महाविद्यालयामध्ये दिनांक २०/१२/२०१८ रोजी प्राचार्य कक्षात घेण्यात आलेल्या सभेमध्ये खालील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली त्या सभेचे इतिवृत्त पुढील प्रमाणे आहे.

**विषय क्र. ०१ :- विद्यापीठ परीक्षेच्या दृष्टीने चर्चा करणे.**

सभेचे अध्यक्ष आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी नागपूर विद्यापीठाच्या परीक्षेसंदर्भात वरील सभेमध्ये चर्चा केली त्यानुसार परीक्षेची जबाबदारी ज्या प्राध्यापकांना देण्यात आली आहे त्यांनी आपले काम पूर्ण जबाबदारीने करावे अशी सूचना केली. त्यावर ज्यांच्याकडे वरील कार्य सोपविण्यात आले त्यांनी परीक्षेची काय काय तयारी झालेली आहे याचा आढावा घेतला तेव्हा ज्या प्राध्यापकांकडे जबाबदारी दिली त्यांना आपले काम त्यांच्या पद्धतीने पूर्ण तयारी निशी केल्याचे प्राचार्यांच्या लक्षात आले. परीक्षेमध्ये कोणताही प्रकार जो अनुचित स्वरूपाचा आहे. असे कोणतेही कृत्य महाविद्यालयाच्या सेन्टरवर घडणार नाही. जेणे करून महाविद्यालयाची बदनामी होईल याची पुरेपूर काळजी घ्यावी अशी सूचना करण्यात आली. तेव्हा ज्यांच्याकडे परीक्षेची जबाबदारी आहे त्यांनी असा कोणताही प्रकार घडणार नाही असे सांगितले.

**विषय क्र. ०२ :- अभ्यासक्रमावर माहिती घेणे**

महाविद्यालयाचे प्राचार्य आणि सभेचे अध्यक्ष यांनी प्रत्येक प्राध्यापकांकडून त्यांनी शिकवून झालेल्या अभ्यासक्रमाबद्दल माहिती जाणून घेतली. त्यावर प्रत्येक प्राध्यापकांनी आपआपल्या विभागाची माहिती प्राचार्यांकडे सादर केली. यामध्ये काही विभागाचे अभ्यासक्रम अजूनपर्यंत पूर्ण झालेले नाहीत हे प्राचार्यांच्या लक्षात आले. तेव्हा त्यांनी असे सूचित केले की सर्वच विभागाने आपले अभ्यासक्रम परीक्षा सुरू होण्यापूर्वी पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. ज्यांच्या विभागाचे अभ्यासक्रम पूर्ण झाले त्यांनी रिव्हीजन घ्यावी अशी सूचना केली. तेव्हा सर्व प्राध्यापकांनी लवकरात लवकर आपला आपला अभ्यासक्रम पूर्ण करू असे मान्य

**विषय क्र. ०३ :- शैक्षणिक सहलीसंदर्भात चर्चा करणे**

प्राचार्यांनी सभेमध्ये अशी सूचना केली की सर्वच विभागाच्या शैक्षणिक सहलीचे जरी वेगवेगळे आयोजन आहे परंतु त्या वेगवेगळ्या पध्दतीने शैक्षणिक सहल आयोजित करण्यापेक्षा बी.ए. आणि बी.कॉम यांच्या संयुक्तपणे शैक्षणिक सहलीचे आयोजन करावे परंतु असे आयोजन करत असतांना सर्वच विभागाच्या शैक्षणिक सहलीचा उद्देश पूर्ण होईल अशा प्रकारचे ठिकाण किंवा आजुबाजुला असलेले ठिकाण जे की विभागाशी संबंधित असेल तेव्हा सर्व विभागांनी ठरवून त्यावर आपली माहिती प्राचार्यांना सादर करावी असे सूचित केले.

**विषय क्र. ०४ :- महाविद्यालयामध्ये तीन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम घेणेसंदर्भात चर्चा करणे.**

वरील विषयाच्या अनुषंगाने प्राचार्यांनी आधी सर्वच प्राध्यापकांचे मत जाणून घेऊन त्यावर असे सूचित केले की, या तिन दिवसाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता आपण काही कमीटीचे नियोजन करून त्यानुसार आपण वरील कार्यक्रम जानेवारी महिन्यामध्ये करावा आणि कोणत्या तारखा घ्याव्यात आणि त्यामध्ये कोणकोणते कार्यक्रम राहतील यांची सर्व प्राध्यापकांनी आपआपल्या स्तरावर तयारी करून तसे प्राचार्यांकडे 25/12/2018 पर्यंत माहिती सादर करावी आणि सर्वांच्या संगनमताने वरील कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले.

**विषय क्र. ०५ :- अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी विषय**

डॉ. कापशीकर यांनी परिक्षेकरीता मॅनपावर लागेल असे प्राचार्यांना प्रश्नात्मक विचारले असता प्राचार्यांनी सर्व प्राध्यापक आपणांस मदत करतील असे सुचविले आणि सभा संपली असे जाहिर केले.

SEAL

Principal
Ashoka Girls Arts & Commerce
College, [illegible] Nagar, Nagpur-15

# 2018-2019 Academic Review Meetings dated 29-4-19 with Staff - Notice

(31)

Page No.
Date 27/04/2019

## " सूचना "

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की प्राध्यापक परिषदेची सत्र अखेरची सभा दिनांक 29/04/2019 रोजी प्राचार्य यांचे कक्षामध्ये सकाळी 12.00 वाजता प्राचार्यांच्या अध्यक्षतेमध्ये घेण्याचे ठरलेले असून वरील सभेमध्ये काही महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे करीता वरील सभेला सर्व प्राध्यापकांची उपस्थिती आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

**प्राध्यापक परिषदेच्या सभेतील विषय**

1. सुट्यांच्या कालातील कामांची चर्चा.
2. प्रवेशासंदर्भात सविस्तर चर्चा करणे.
3. निकालानंतरच्या येणे संदर्भात चर्चा करणे.
4. नॅक संदर्भात चर्चा करणे
5. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा

समन्वयक
[स्टाफ कौन्सिल]

SEAL

Principal
Ashoka Girls Arts & Commerce College, Baoh Nagar, Nagpur-15

**महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ प्राध्यापकांच्या सह्या**

| | प्राध्यापकांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| 1 | Rajesh Ghogre | R. B. Ghogre |
| 2 | Amol Raut | [illegible] |
| 3 | | |
| 4 | | |
| 5 | R. L. Meshram | RMache |
| 6 | S. S. Thool | [illegible] |
| 7 | Suryakant Kapshikar | [illegible] |
| 8 | V P Pinge | VPinge |
| 9 | V. S. Banka | VBank |
| 10 | | |
| 11 | | |
| 12 | | |
| 13 | | |

## सभेचे इतिवृत्त (अहवाल).

Page No.
Date 30.04.2019

महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये दिनांक 29/04/2019 रोजी प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली प्राध्यापक परिषदेची सभा सकाळी 12.00 वाजता घेण्यात आली व खालील सभेमध्ये खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

**विषय क्र. 01 :- सुट्यांच्या काळातील कामावर चर्चा.**

प्राचार्यांनी सुट्यांच्या काळामध्ये सर्वच प्राध्यापकांना काही जबाबदाऱ्या देण्यात येत आहेत असे सूचित केले. आपले प्रवेश संदर्भातील राहिलेली कामे आपण पूर्ण करावी जोपर्यंत आपल्या विभागाचे आणि आपणांस दिलेले काम पूर्ण होत नाही तोपर्यंत आपण महाविद्यालयामध्ये येणे अनिवार्य आहे. कारण ते आपलेच काम आहे आणि त्याची जबाबदारी देखील आपलीच आहे. करीता आपण ते पूर्ण करून उर्वरित सुट्यांचा उपभोग घ्यावा परंतु तो घेत असताना कार्यालयाकडे आपली माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे की आपण किती दिवस बाहेर आहात.

*तसेच आपणांस विद्यार्थिनींच्या प्रवेशाची यादी देखील शाळांना सुट्या लागण्यापूर्वी गोळा करून आम्हांकडे देणे आवश्यक आहे. कारण आपला विभाग आपल्यालाच टिकवून ठेवण्याकरीता हे कार्य देखील आपले जबाबदारीचे कार्य आहे असे प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना सूचित केले त्यावर सर्व प्राध्यापकांनी त्याला मान्यता दिली.

**विषय क्र. 2 :- प्रवेशासंदर्भात सविस्तर चर्चा करणे**

आपण विषय क्रमांक 1 मध्येच याची जाणीव आपणांस दिलेली आहे असे प्राचार्यांनी सूचित केले. तरी जर आपण प्रवेश आणणार नाही तर आपले महाविद्यालय कसे चालणार आपणांस याची जाणीव आहे की मराठी माध्यमाच्या महाविद्यालयाकडे विद्यार्थ्यांचा कल कमी आहे तरी देखील आपण सर्व लोकांच्या प्रयत्नामुळे आपल्या महाविद्यालयामध्ये चांगले प्रवेश होतात आपण सर्व मिळून यावर्षी देखील जोमाने कार्यास लागून अधिकाधिक प्रवेश आणावे असे प्राचार्यांनी सुचविले तेव्हा प्राध्यापकांनी देखील आम्ही अधिकाधिक प्रवेश मिळवू असे प्राचार्यांना सांगून आम्ही सर्व [illegible]

**विषय क्र०३ :- निकालानंतर महाविद्यालयात येणे संदर्भात चर्चा**

प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की सध्या आपण नॅक संदर्भात कामे करण्याकरीता महाविद्यालयामध्ये येऊन आपण आपली कामे पूर्ण करतो आहे हि कामे पूर्ण झाल्यानंतर जर आपल्या नागपूरच्या १० बोर्ड आणि 12 वी बोर्डच्या निकाल जर जून महिन्यामध्ये आपल्या सुट्या संपण्यापूर्वी लागला तर मात्र आपल्याला प्रवेश मिळविण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात यावे लागेल अन्यथा आपण आपल्या सुट्यांचा पूर्ण उपभोग घेऊ शकता. परंतु सोबतच शाळांच्या आणि ज्युनिअर महाविद्यालयांच्या संपर्कात आपण असणे अत्यंत आवश्यक याकरिता आहे की आपल्याला महाविद्यालयामध्ये प्रवेशाची अत्यंत आवश्यकता आहे. कारण त्यावरच आपला विभाग निर्भर असणार आहे. करीता सर्वांनी सुट्टीच्या काळात देखील प्रवेश मिळविण्याकरीता प्रयत्न करावे अशी सूचना महाविद्यालयाच्या प्राचार्य आणि सभेचे अध्यक्ष यांनी केली.

**विषय क्र०४ :- नॅक संदर्भात चर्चा करणे**

प्राचार्यांनी नॅक संदर्भात सर्व प्राध्यापकांना अशी सूचना केली की आपल्याला दर वर्षी नॅक संदर्भातील माहिती ऑनलाइन पध्दतीने पाठविणे आवश्यक असते. तेव्हा सत्र सुरू झाल्यानंतर आपणांस नॅक संदर्भातील ज्या विभागाची प्रत्येक प्राध्यापकाला जी जबाबदारी दिली होती. त्यांनी ती संपूर्ण माहिती स्कॅन करून किंवा प्राचार्य यांच्याकडे संपूर्ण रेकार्डसह सादर करावी जेणेकरून या वर्षीची माहिती तात्काळ पूर्ण करता येईल. यावर सर्वच विभागाच्या प्राध्यापकांनी आपल्याला माहिती लवकरात लवकर आम्ही देऊ असे सांगितले.

**विषय क्र०५ :- अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय**

अध्यक्षांच्या परवानगीने कोणीही कोणताच प्रश्न न विचारल्यामुळे अध्यक्षांनी सभा संपली असे जाहिर केले.

समन्वयक
[स्टाफ कौन्सिल]

SEAL

Principal
[illegible] Girls Arts & Commerce
College,Sneh Nagar,Nagpur-15

# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Staff Council Meeting Register

## Review Meetings for Teaching, Learning and Evaluation process in the Institution

## Academic Session: 2019-2020

Page
Date

Staff Council Meeting
Register.
(From Session 2019-2020)

It is certified that this register is for writing staff Council Meeting Reports with effect from July 2019 & for Yashoda Girls' Arts & Commerce College.

[signature] 26/6/2019
PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

# 2019-2020 Academic Review Meeting dated 1/7/2019- Notice for the Meeting

Page
Date 26/06/2019.

## सभेची सुचना

सर्व प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की प्राध्यापक परिषदेची सत्र 2019-20 ची पहिली सभा दि. 1 जुलै 2019 रोजी ठिक 12=00 वाजता प्राचार्य कक्षात घेण्यात येणार आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी सभेला हजर राहावे.

### सभेतिल विषय

1) सत्र 2019-20 करीता विभाग वितरण करणे.
2) महा.त विविध बाबीमधील शिस्तपालनासंदर्भात चर्चा करणे.
3) अभ्यासक्रम व परीक्षा पध्दती संदर्भात चर्चा करणे.
4) "यशोधन" वार्षिकांक संदर्भात जबाबदारी देणे.
5) AQAR-2018-19 तयार करण्यासंदर्भात चर्चा करणे.
6) 'Y.K.S संदर्भात चर्चा करणे व जबाबदारी देणे
7) NAAC SEMINAR संदर्भात जबाबदारीचे विभाजन करणे
8) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे अन्य विषय.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

| प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|
| 1) के. जी. मेश्राम | |
| 2) Suryakant Kapshikar | |
| 3) S. S. Thool | |
| 4) P. G. Fating | |
| 5) M. D. Katre | |
| 6) R. L. Meshram | |
| 7) Lalita Punnyar | |
| 8) Prakash S. Sorak | |
| 9) S. P. Sambare | |
| 10) V. S. Banka | |
| 11) | |
| 12) | |
| 13) | |
| 14) | |

(H) College Extension Activities Programme & outreach Program या विभागाची समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ. सोनक सर यांना देण्यात आली. वरील दोन्ही विभागांना त्यांच्या कार्याचे वार्षिक नियोजन २० जुलै पूर्वी प्राचार्यांकडे सादर करण्यासंदर्भात सूचित करण्यात आले.

(I) महिला अध्ययन व सेवा केंद्र - याची समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ. रावळेकर यांचेकडे देण्यात आली. व त्यांनी किमान दोन कार्यक्रम राबवावे अशा त्यांना सूचना देण्यात आल्या.

(J) माजी विद्यार्थी संघटना व विद्यार्थी विकास समिती - या समितीची समन्वयक म्हणून जबाबदारी सुद्धा डॉ. रावळेकर यांना देण्यात आली. त्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या सभा आयोजित करणे व मागील दोन वर्षात बी.ए./बी.कॉम मधून आपल्या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींच्या प्रगतीचा अहवाल सप्टेंबर २०१९ पूर्वी तयार करण्यासंबंधी त्यांना सूचना देण्यात आल्या.

(K) यशोदा नॉलेज सिरीज - या विभागाची वार्षिक जबाबदारी डॉ. सोनक यांच्याकडे देण्यात आली. त्याचप्रमाणे यासंदर्भात संपूर्ण अहवाल त्यांनी वर्षाच्या शेवटी प्राचार्यांस सादर करावा अशा सूचना देण्यात आल्या.

(L) राष्ट्रीय व सामाजिक मूल्यावर आधारीत कार्यक्रम - या विभागाची समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ. सोनक सर यांना देण्यात आली.

त्याचप्रमाणे त्यासंदर्भात संपूर्ण अहवाल त्यांनी वर्षाच्या शेवटी प्राचार्यास सादर करावा अश्या सूचना देण्यात आल्या.

(L) राष्ट्रीय व सामाजिक मूल्यावर आधारित कार्यक्रम - या विभागाची समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ. सोनक सर यांना देण्यात आली व त्यांनी राष्ट्रीय व सामाजिक मुल्ये विद्यार्थिनींमध्ये रुजविण्याच्या संदर्भात घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचा आराखडा २० जुलैपूर्वी प्राचार्यांकडे सादर करावा असे सूचित करण्यात आले व त्याप्रमाणे डायरी राबविण्यास सांगितले.

(M) सेमिनार, कॉन्फरंस व प्रोजेक्ट कमीटी - या समितीचे समन्वयक म्हणून डॉ. अमोल राऊत यांना नियुक्त करण्यात आले. त्यांनी किमान चार विषयामध्ये ICSSR कडे सेमिनार आयोजित करण्यासंबंधी अनुदानाचे प्रस्ताव दिवाळीपूर्वी पाठवावे अश्या सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकर फाउंडेशन तर्फे देण्यात येणाऱ्या अनुदानाकरीता सुद्धा त्यांनी प्रस्ताव तयार करावा अश्या सूचना देण्यात आल्या.

(N) कमीटी फॉर Institutional best practices - या समितीची समन्वयक म्हणून जबाबदारी प्रा. रेखा मेश्राम यांच्याकडे देण्यात आली. व या समिती अंतर्गत कार्यक्रम राबविणे व त्यांचा व्यवस्थित अहवाल, फोटो ठेवणे NAAC च्या दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचे असल्याने, ते कार्यक्रम परिणामकारक रित्या राबविणे महत्वाचे आहे अश्या सूचना त्यांना देण्यात आल्या.

Page
Date

(O) शिस्तसमीती — शिस्तसमितीच्या समन्वयक म्हणून डॉ. लुल्ली पूनच्या यांची निवड करण्यात आली. त्यांना प्रत्येक शिक्षक रजेवर असल्यास त्यांच्या वर्ग सांभाळण्याची जबाबदारी तसेच सर्व विद्यार्थिनींनी तासिका सुरु असतांना वर्गात असले पाहिजे, त्यांनी महाविद्यालयीन परिसरात वर्गाबाहेर असू नये हि दक्षता घेण्यासबंधी सूचना देण्यात आल्या.

(P) शिक्षक पालक सभा समिती — या समितीची समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ. सोनक सर यांचेकडे देण्यात आली. व शिक्षक पालक सभेचे वार्षिक नियोजन त्यांनी करावे. यासबंधी सूचना देण्यात आल्या.

(Q) विद्यार्थी तक्रार निवारण समीती — या समितीची समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ. सांबारे सर यांना देण्यात आली. त्यांनी वर्षभरात चार सभेचे नियोजन करावे असे सूचित करण्यात आले.

(R) Whatsup Group कमीटि — हि समीती खालीलप्रमाणे तयार करण्यात आली.
1. प्रा. घोगरे — वर्ग 11वा वर्ग 12वा
2. डॉ. मेश्राम — बीकॉम I / III
3. डॉ. कटरे — बी ए III / बीकॉम II
4. डॉ. राउत — बी ए II
5. डॉ. कापशीकर — बी ए I

(S) Academic Calendar Committee — या समितिचे समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ.

सेवक यांना देण्यात आली. व मागील तीन वर्षाचे ॲकेडेमिक कॅलेंडर महाविद्यालयाच्या website वर त्यांनी अपलोड करावे अशा सूचना देण्यात आल्या.

(७) Linkage & MoU समिती — या समितीची समन्वयक म्हणून जबाबदारी डॉ. राउत यांना देण्यात आली. MoU करण्यासदंर्भात मागील वर्षी प्रयत्न करून सुद्धा यश आले नाही. म्हणून यावर्षी जास्तीचे प्रयत्न करून दिवाळीपूर्वी MoU's & Linkages तयार करण्याचे काम पूर्ण करण्यासंबंधी डॉ. राउत यांना सूचित करण्यात आले.

(८) स्पर्धापरिक्षा व मार्गदर्शन समिती — या समितीचे समन्वयक म्हणून डॉ. कापशीकर यांना नियुक्त करण्यात आले. व यावर्षी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शनात विविधता आणण्यासाठी प्रयत्न करावे अशा सूचना प्राचार्यांनी दिल्या.

(९) Placement cell व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण — या विभागाचे समन्वयक म्हणून डॉ. कटरे यांना नियुक्त करण्यात आले. व त्यांनी २० जुलैपूर्वी वार्षिक नियोजन सादर करावे अशा सूचना देण्यात आल्या.

(१०) विद्यार्थी परिषद — या समितीचे समन्वयक म्हणून डॉ. सांबारे यांना नियुक्त करण्यात आले. व त्यांनी विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे विद्यार्थी परिषद गठीत करण्याचे कार्य पूर्ण करावे असे सूचित करण्यात आले.

Page
Date

⑧ API / PBAS समिती - या समितीचे समन्वयक म्हणून डॉ. मेश्राम यांना नियुक्त करण्यात आले. व सर्व प्राध्यापकांनी आपले API/PBAS चे फॉर्म दिवाळीपूर्वी भरून सादर करावे अश्या सूचना देण्यात आल्या.

⑨ पर्यावरण जाणीव जागृती समिती - या समितीच्या समन्वयक म्हणून प्रा. रेखा मेश्राम यांनी कार्य करावे व त्याचा अहवाल सत्राच्या शेवटी सादर करावा अश्या सूचना देण्यात आल्या.

विषय क्र. २ - महाविद्यालयात वक्तशिरपणा व शिस्तीचे पालन करणे - प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना महाविद्यालयाची निर्देशित वेळ पाळणे आवश्यक आहे, असे सांगितले शिवाय तिन वेळा Late Mark झाल्यास एक किरकोळ रजा (एक महिन्याच्या कालावधीमध्ये) कापण्यात येईल असे सांगितले सर्वच प्राध्यापकांना तासिका सूरु होताच वर्गात जाणे व Annual Evaluation Planning प्रमाणे वेळेवर घटक चाचण्या व इतर परिक्षा घेणे बंधनकारक राहील असे सूचित केले त्याचप्रमाणे प्रत्येक शनिवारला Daily Diary प्राचार्यांच्या स्वाक्षरीकरीता आणणे व वर्गात शिकविलेल्या अभ्यासक्रमाची प्रामाणिकपणे त्यात नोंद करण्यासबंधी सूचित केले. त्याचप्रमाणे प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय व हलचल रजिस्टरवर नोंद केल्याशिवाय महाविद्यालयीन वेळेत महाविद्यालयाचा परीसर सोडून कुठेही जाणार नाही. शिवाय एखादया कामाकरीता जाण्याची नोंद व येण्याची

नोंद नसेच कामाचे स्वरुप हलचल रजिस्टर मध्ये लिहिणे सर्व प्राध्यापकांना बंधनकारक राहील असेही सुचविले.

विषय क्र. 3 – Semester wise Teaching Plan प्रमाणे अभ्यासक्रम व मुल्यमापन कार्यक्रम राबविणे – सर्वच प्राध्यापकांना प्रत्येक सेमीस्टरमध्ये वर्षाच्या आधीच केलेल्या नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करणे शिवाय मुल्यमापनांचे काम पूर्ण करणे बंधनकारक आहे असे प्राचार्यांनी सांगितले. दैनंदिनी-प्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण आहे व वर्गामध्ये तो अपूर्ण आहे असे आढळल्यास कार्यवाही करण्यात येईल असेही ते म्हणाले. महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रीत शिक्षण पध्दतीचा वापर करुन निकाल वाढविणे व Drop out rate कमी करणे हे उद्दिष्ट असल्याने प्राध्यापकांद्वारे तासिका घेण्याबाबत हलगर्जीपणा चालणार नाही असेही ते म्हणाले.

विषय क्र. ४ – 'यशोधन' वार्षिकांकाच्या जबाबदारीबाबत चर्चा करणे – सत्र २०१९-२० च्या वार्षिकांकाची जबाबदारी समन्वयक म्हणून डॉ. पूनय्या मॅडम यांचेकडे देण्यात आली. या समितीमध्ये इतर सदस्य म्हणून डॉ. रावनेकर, प्रा. रेखा मेश्राम, प्रा. घोगरे, डॉ. हिंगे मॅडम यांना नियुक्त करण्यात आले. वार्षिकांकाचे काम अचुकपणे व्हावे व ते मार्च महिन्यापर्यंत पूर्ण करण्यात यावे याची संपूर्ण जबाबदारी या समितीकडे देण्यात आली.

विषय क्र. 5 – सत्र २०१८-१९ चा AQAR

तयार करणे — AQAR 2018-19 तयार करावयाचा असल्याने मागील सत्रात ज्या प्राध्यापकांकडे AQAR विषयक कामे दिलेली आहेत. त्यांनी सत्र 2018-19 चा AQAR ऑगस्टपूर्वी तयार करून पाठविण्याची तयारी करण्याच्या दृष्टीने जबाबदारीपूर्वक माहिती प्राचार्यांकडे किंवा IQAC समन्वयकाकडे द्यावी असे प्राचार्यांनी सूचित केले.

विषय क्र. 6 — YKS संदर्भात चर्चा करणे — Yashoda Knowledge Series ची संपूर्ण वार्षिक जबाबदारी डॉ. सोनक यांचेकडे देण्यात आली.

विषय क्र. 7 — NAAC सेमिनार विषयक चर्चा करणे. प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना सांगितले कि, दि 24 ऑगस्ट रोजी महाविद्यालयात NAAC Sponsored सेमिनार आयोजित केलेला आहे. त्यासंबंधी संपूर्ण जबाबदाऱ्यांचे विभाजन प्राचार्यांनी केले व सेमिनार उत्कृष्टपणे पार पाडण्यास व रजिस्ट्रेशन करीता सहकार्य करण्याचे सर्वांना आवाहन करणे.

विषय क्र. 8 — इतर विषयामध्ये प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना दि 01 जुलै ते 07 जुलै पर्यंत B A व B com या वर्गाकरीता Bridge Course घेणे व Daily Diary मध्ये त्याची नोंद करणे अनिवार्य असल्याचे सूचित केले. त्याचप्रमाणे सर्वच विद्यार्थ्यांनी परिक्षा फॉर्म भरावे यासंबंधीची जबाबदारी प्राध्यापकांनी घ्यावी व हे सर्व कार्य वेळेच्या आधीच पूर्ण व्हावे याकरीता सर्वच Mentor नी कार्य करावे अश्या सूचना दिल्या. त्यानंतर प्राचा-

# 2019-2020 Academic Review Meeting dated 12/9/2019- Notice for the Meeting

Page
Date

## सभेची सूचना

05.09.2019

सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते कि, प्राध्यापक परिषदेची सत्र २०१९-२० ची दुसरी सभा दि. १२.०९.२०१९ ला दुपारी २:०० वाजता प्राचार्य कक्षात घेण्यात येणार आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी सभेला उपस्थित रहावे.

### सभेतील विषय-

1. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे
2. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात चर्चा करणे.
3. सेमिनारच्या यशस्वी आयोजनाबाबत चर्चा करणे.
4. सेमिनारकरिता नवीन प्रस्ताव अनुदानाकरिता ICSSR कडे पाठविण्याबाबत.
5. विद्यापीठ परिक्षा निकाल उन्हाळी २०१९ संदर्भात माहिती देणे.
6. ड्रॉपआउट रेट कमी करण्यासंदर्भात चर्चा करणे.
7. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

| प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|
| 1. Dr. S. P. Sorambar | |
| 2. Dr. P. S. Sonak | |
| 3. Dr. P. G. Faling | |
| 4. Amol Raut | |
| 5. R. L. Meshram | |
| 6. M. D. Kutre | |
| 7. Suryakant Kapshikar | |
| 8. Dr. Govind N. Rawlekar | 12/9/2019 |
| 9. Lalita Punnya | |

# 2019-2020 Academic Review Meeting dated 12/9/2019- Report of the Meeting



दि. १२.०९.२०१९च्या प्राध्यापक परिषदेच्या सभेचा अहवाल.

दि. १२.०९.२०१९ रोजी ठिक १२.०० वाजता प्राचार्य कक्षात प्राध्यापक परिषदेची सभा घेण्यात आली. सर्वप्रथम प्राध्यापक परिषदेच्या सचिवांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेटे सर त्यांना सभेचे अध्यक्षस्थान भूषविण्याची विनंती केली व त्यानंतर सभेच्या कार्यवाहीला सुरवात झाली. सर्वप्रथम मागील सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते त्यास मान्यता देण्यात आली. त्यानंतर सभेमध्ये खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

विषय क्र. १ – सर्वप्रथम सचिवांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली

विषय क्र. २ – प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना सूचित केले कि, प्रवेश प्रक्रिया संपल्यामुळे ज्या विद्यार्थीनी महाविद्यालयात गैरहजर राहतात अश्या विद्यार्थिनींची यादी तयार करून त्या विद्यार्थीनींच्या Mentor द्वारे त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना नियमित वर्गात उपस्थित राहण्यासंदर्भात सूचना दिल्या.

विषय क्र. ३ – व ४ – NAAC sponsored सेमिनारच्या यशस्वी आयोजनाबद्दल व सर्व प्राध्यापकांनी त्यामध्ये सहकार्य केल्याबद्दल प्राचार्यांनी सर्वांचे कौतुक केले. व सेमिनारकरीता नविन प्रस्ताव ICSSR कडे पाठविण्याबाबत तयार करण्याकरीता प्राध्यापक फुलेंग, प्रा. कुटे, प्रा. मेश्राम मॅडम व प्रा.

प्रा. पुनच्या व प्रा. कापशीकर यांना सूचित करण्यात आले. त्याबाबत सर्व प्राध्यापकांनी तयारी दर्शविली.

विषय क्र. 5 — त्यानंतर विद्यापीठ परिक्षा निकाल उन्हाळी 2019 केवळ 13% लागल्याने NAAC द्वारे मूल्यांकन करतांना अडचणी येवू शकतात. म्हणून सर्व प्राध्यापकांनी आपल्या विषयाच्या निकाल किमान 50% च्या वर असावा म्हणून प्रयत्न करावे अशा सूचना प्राचार्यांनी दिल्या.

इंग्रजी विषयाचा निकाल 13% असल्याने बी.ए. भाग २ मध्ये प्रवेशित विद्यार्थिनींची संख्या फार कमी झालेली आहे म्हणून इंग्रजी विषयाचा निकाल वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विशेष प्रयत्न करण्यात यावे. जेणेकरून महाविद्यालयाच्या एकूण प्रवेशित संख्येवर त्याचा परिणाम होणार नाही. अशा सूचना प्राचार्यांनी संबंधीत प्राध्यापकांना दिल्या.

विषय क्र. 6 — महाविद्यालयाच्या Drop out रेट विशेषत: कला शाखेमध्ये बी.ए. भाग 1 मधील 66 वरून बी.ए. भाग २ मध्ये केवळ २५ इतका कमी झालेला आहे याबाबत प्राचार्यांनी चिंता व्यक्त केली व सर्व प्राध्यापकांनी विशेष प्रयत्न करून आपला निकाल वाढविण्यासंबंधी व विद्यार्थिनींची उपस्थिती वाढविणे त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे वेळोवेळी त्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविणे याबाबत गांभीर्याने काम करण्याच्या सूचना प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना दिल्या.

# 2019-2020 Academic Review Meeting dated 21-9-2019

Page No.: 2
Date: / /

## सूचना

20.09.19

सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की, आज दि. 21.09.2019 ला दुपारी 12:00 वाजता प्राचार्य कक्षात सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी सभेला उपस्थित राहावे.

सभेतील विषय—

1. अभ्यासक्रमाबाबत चर्चा करणे.
2. Criterion II करिता समन्वयकाची नियुक्ती करणे
3. Drop-out rate कमी करण्यासंदर्भात चर्चा करणे.
4. CIE करिता निर्णय घेणे.
5. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय.

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

1. Suryakant Kapshikar
2. S. S. Thool
3. Amol Raut — 21/9/2019
4. S. P. Sonbae — 21/9/2019
5. Dr. P. S. Sonale — 21/09/2019
6. Dr. P. G. Fating — 21/9/2019
7. K. G. Meshram
8. R. L. Meshram

# 2019-2020 Academic Review Meeting dated 23-09-2019

Page No.: 3

Date:

## सभेचा अहवाल

Date 23|09|2019

* दिनांक 21|9|2019 ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनराज शेटे यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची सभा दुपारी 12.00 वाजता प्राचार्यांच्या कक्षात आयोजित करण्यात आली सभेतील विषयाच्या अनुषंगाने चर्चा करून निर्णय घेण्यात आलेत.

**विषय क्र. 1 → अभ्यासक्रमा संदर्भात चर्चा करणे**

वरील विषयाच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली त्यावर प्रत्येक विषयाच्या प्राध्यापकांनी आपल्या शिकवून झालेल्या आणि उर्वरित असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती दिली. त्यावर अध्यक्षांनी लवकरात लवकर आपला अभ्यासक्रम पूर्ण करावा आणि रीव्हिजन घ्यावे अश्या सूचना केल्या याला सर्वच प्राध्यापकांनी मान्य करून लवकरात लवकर आम्ही याचे पालन करू असे सांगितले.

**विषय क्र. 2 → Criterion II करीता समन्वयकाची [illegible] कालावधीकरीता नियुक्ती करणे.**

वरील विषयाच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली यावर परिक्षेच्या दृष्टीकोणातून आणि विद्यापीठ परिक्षेच्या निकालाकरीता प्राचार्यांनी सत्र 2019-20 करीता तात्पुरत्या कालावधीकरीता समन्वयक म्हणून डॉ. प्रकाश सोनक, यांना जबाबदारी सोपविली त्याला सर्व प्राध्यापकांनी एकमताने मान्यता दिली.

**विषय क्र. 3 → Drop-out Rate कमी करण्यासंदर्भात**

वरील विषयावर चर्चा करण्यात आली यामध्ये प्रत्येक विद्यार्थिनींना त्यांच्या विषयानुसार सर्वच प्राध्यापकांनी नोट्स देणे, महाविद्यालयात नियमित येण्याबाबत विद्यार्थिनीशी फोनवर संपर्क साधने, आपल्या विषयाचा निकाल समाधानकारक लावण्याकरीता प्रयत्न करणे, जेणे करून विद्यार्थी संख्या कमी होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेणे यावर सर्व प्राध्यापकांनी आम्ही अधिकाधिक प्रयत्न करू असे मत स्पष्ट केले.

Page No.:
Date: / /

## विषय क्र. ४ ⇒ CIE करीता निर्णय घेणे

वरील विषयावर चर्चा करण्यात आली प्राचार्यांनी यावर सूचना केली की प्रत्येक विषयाच्या प्राध्यापकांनी आपल्या विषयाच्या चार घटक चाचण्या घ्याव्यात प्रत्येक युनीटवर आधारित एक घटक चाचणी असावी, घटक चाचणी घेतल्यानंतर पेपर तपासून मार्क्स टाकणे त्याचा निकाल सादर करणे, एकून किती विद्यार्थिनींनी परिक्षा दिली त्यांची संख्या सादर करणे, अभ्यासक्रम पूर्ण शिकवून झाल्यानंतर 80 गुणाची परीक्षा आपल्या सोयीनुसार विद्यापिठ परिक्षेअगोदर घेणे त्याची पूर्व सूचना देणे, पेपरमध्ये अडचणी किंवा त्रूटी असल्यास विद्यार्थिनींना पेपर तपासून दिल्यानंतर मार्गदर्शन करणे, यावर सर्व प्राध्यापकांनी सहमती दर्शविली

## विषय क्र. 5 ⇒ अध्यक्षाच्या परवानगीने येणारे विषय

वरील सभेमध्ये वेळेवर येणाऱ्या विषयावर देखील सविस्तर चर्चा झाली. प्राचार्यांनी सर्वप्रश्नांची सोडवणूक केली. सभेचे विषय संपल्यामुळे सभा संपली असे जाहीर करण्यात आले.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

### सभेला उपस्थित सर्व प्राध्यापकांच्या सह्या

1. Pr. S. P. Sarambane
2. Dr. M. D. Katre
3. Dr. G. M. Rawlekar
4. Suryakant Kapshikar
5. Amol Raut
6. Lalita Punmyer
7. R.L. Meshre
8. K. G. Meshram
9. P. S. Sonak
10. 

SEAL

# 2019-2020 Academic Review and Planning meeting dated 05-03-2020

Page No.: 13
Date: 05/03/20

## सूचना

वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की B.A. I, III, V Sem आणि B.Com I, III, V Sem च्या विद्यापीठाच्या परिक्षेमध्ये ज्या विद्यार्थिनी अनुत्तीर्ण झाल्यात किंवा ज्या विद्यार्थिनींना B.A., B.Com. II, IV, VI च्या आपण घेतलेल्या चाचणी परिक्षेमध्ये कमी गुण मिळाले अशा Slow Learners व ज्यांना जास्त गुण मिळाले अशा Advanced Learners ची यादी तयार करून प्राचार्यांच्या सहिनिशी डॉ. प्रकाश सोनक यांचे कडे त्या संदर्भात खालीलप्रमाणे दस्तावेज तयार करून सविस्तर माहिती 30 मार्च पूर्वी सादर करावी.

1. Remedial classes घेण्यासंबंधी प्राचार्यांना दिलेला विनंतीअर्ज
2. प्राचार्यांकडून मान्य केलेले वेळापत्रक.
3. Slow learners आणि Advanced Learners ची यादी.
4. Geo-tagged Photo
5. हजेरी पत्रक

प्राचार्य
SEAL
PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

1) अमोल राऊत — 5/3/2020
2) रेखा मेश्राम
3) [illegible]
4) K. G. Meshram
5) D. S. Fating
6) Dr. G. N. Rawlekar
7) Suryakant [illegible]
8) Dr. M. D. Katre — 06/03/2020
9) S. P. Sambare — 7/3/2020
10) P. S. Sonale

Page No.:
Date 05/03/20

# अहवाल

महाविद्यालयातील सर्व वरीष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची सभा दिनांक 05/03/20 रोजी प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्य डॉ. शेटे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. वरील सभेमध्ये सर्वच विषयावर चर्चा होवून त्याचा अहवाल सादर करण्यात आला.

मुद्दा क्र.1 :→ Remedial Classes घेणेसंबंधी सर्व प्राध्यापकांनी प्राचार्यांना विनंती अर्ज सादर करण्यात यावे असे अध्यक्षांनी सूचना केली तेव्हा सर्व प्राध्यापकांनी यावर होकार देवून आपली परीक्षा आणि सोयीनुसार वरील वर्ग घेणेसंदर्भात अर्ज करावे असे ठरविण्यात आले.

मुद्दा क्र.2 :→ प्राचार्यांकडून वेळापत्रक मान्य करून घ्यावे असे सभेमध्ये सांगण्यात आले त्यानुसार प्रत्येकाचे वेगवेगळे वेळापत्रक असावे. एकाच वेळेला सर्व वर्ग घेता येणार नाही. करीता त्याचे योग्य वेळापत्रक तयार करण्याची जबाबदारी कापडीकर यांना देवून त्याला मान्यता घ्यावी असे सर्वानुमते अध्यक्षांनी ठरविले.

मुद्दा क्र.3 :→ सर्वच विभागाने यानंतर होणाऱ्या कार्यक्रमाचे फोटोग्राफ्स जी.पी.एस. मध्येच घ्यावेत कारण नॅकचे नियम बदललेले असून त्यांना आता केवळ त्याच फोटो पाहावयाच्या असल्यामुळे सर्वांनी टी.ओ.टी. कॅम फोटोग्राफच्या (किंवा फोटोच्या) घ्याव्यात असे अध्यक्षांनी सूचित केले.

मुद्दा क्र.4 :→ प्रत्येक विभागाने आपले हजेरी रजिस्टर तयार केलेले असून आपण लवकरात लवकर ते ऑफिस मध्ये सबमिट करावे असे अध्यक्षांनी सूचित केले. त्यावर सर्व प्राध्यापकांनी त्याला होकार देवून दोन दिवसामध्ये देण्याचे मान्य केले.

मुद्दा क्र.5 :→ अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषयाचे विषय नसल्यामुळे सभा संपली असे अध्यक्षांनी जाहिर केले.

SEAL

Principal
Yashoda Girls Arts & Commerce

# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Staff Council Meeting Register

## Review Meetings for Teaching, Learning and Evaluation process in the Institution

## Academic Session: 2020-2021

## दिनांक 27/01/2021 च्या सभेचा अहवाल

आज दिनांक 27/01/2021 बुधवारला दुपारी 12.00 वाजता प्राचार्यकक्षामध्ये प्राध्यापक परिषदेची Virtual Classes (8 दिवसीय कार्यक्रम) राबविण्यासंदर्भात प्रा. डॉ. धनराज शेटे यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम सभाध्यक्षांनी सदर Virtual Classes आयोजित करण्यामागची पार्श्वभूमी व आवश्यकता सर्वांना समजावून सांगितली तसेच सर्व संबंधित प्राध्यापकांनी प्रत्येक वर्गाच्या, प्रत्येक विषयाचे कमीत कमी 3 ते 5 Guest lectures Online पद्धतीने द्यावे. त्याकरीता प्राध्यापकांनी महत्वाच्या अभ्यासक्रमाच्या भाग शिकविण्यावर भर द्यावा. विद्यार्थिनींची परीक्षेची तयारी करण्याच्या दृष्टीने सदर वर्ग घेण्यात येत आहे. हे सुध्दा प्राचार्यांनी स्पष्ट केले. त्याकरीता कला शाखेचे वेळापत्रक तयार करण्याची जबाबदारी डॉ. सुर्यकांत कापशिकर यांचेकडे तर वाणिज्य शाखेची जबाबदारी डॉ. के. जी. मेश्राम यांचे कडे देण्यात आली. त्याकरिता वेळापत्रक तयार करताना सर्व विद्यार्थिनींना त्याचा लाभ घेता यावा या दृष्टीने तयार करण्यास सर्व प्राध्यापकांनी सहकार्य करावे अशा सूचना सुद्धा प्राचार्यांनी दिल्या जर online Link देण्यासंदर्भात काही प्राध्यापकांना अडचण असेल तर त्याकरीता डॉ. कापशीकर डॉ. राहुल सर, तसेच डॉ. के. जी. मेश्राम सर सदर प्राध्यापकांना मदत करतील अशा सूचना सुध्दा प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना दिल्या. सम्पूर्ण तयारी 1 February पर्यंत प्राध्यापकांनी करून आठ दिवसीय Virtual Classes द्यावे व आपल्या विषयाची जबाबदारी संबंधित प्राध्यापकांनीच घ्यावी अशा सूचना सुद्धा देण्यात आल्या आप आपल्या विषयाची Link पाठविणे, Guest च्या परिचय करून देणे व Lecture संपल्यानंतर आभार व्यक्त करणे सर्व बाबी संबंधित विषयाच्या प्राध्यापकांकडेच देण्यात आल्या सर्व उपस्थित प्राध्यापकांनी सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यास होकार दिला व त्यानंतर सभा समाप्त झाली.

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Nagpur-15

वरील सभेला खालील प्राध्यापक वर्ग उपस्थित होता

| नाव | स्वाक्षरी |
|---|---|
| ① Dr. Govind Namdeo Rawleka | [signature] |
| ② Pr. S. P. Sambare | [signature] |
| ③ अमोल राऊत | [signature] .../2/2021 |

# 2020-2021 Academic Review Meeting Report dated 12-2-2021

सभेचा अहवाल

दिनांक 12/02/2021

**दिनांक 12.02.2021 च्या प्राध्यापक परिषदेच्या सभेचा अहवाल**

दिनांक 12/02/2021 शुक्रवार रोजी प्राचार्य कक्षात दुपारी 12.00 वाजता प्राध्यापक परिषदेची सभा घेण्यात आली. सभेला वरीष्ठ महाविद्यालयाचे सर्वच प्राध्यापक उपस्थित होते. सभेचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनराज शेटे सर यांनी भूषविले सभेमध्ये खालील प्रमाणे विविध विषयांवर चर्चा करण्यात आली

<u>विषय क्र. 1</u> :→ या विषयाअंतर्गत प्राचार्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दिनांक 11/2/2021 च्या परिपत्रकानुसार महाविद्यालयातील वर्ग दिनांक 15/2/2021 पासून नियमित पणे घेण्यास सर्व प्राध्यापकांना सुचित केले तसेच कोणत्याही विद्यार्थिनीना त्यांच्या पालकांकडून सम्मती पत्र महाविद्यालयात सादर केल्यानंतरच त्यांना वर्गात बसू द्यावे अश्या सूचना दिल्या वर्गामध्ये सोशल डिस्टसिंगचे सर्व नियमांचे पालन करण्यात यावे यांसदर्भात सूचना दिल्या, सर्व विद्यार्थिनीनी वर्गात आणि परिसरात वावरतांना <u>मास्कचा</u> वापर करणे बंधनकारक असल्याने सर्व प्राध्यापकांनी त्याबाबत दक्षता घ्यावी असे देखील सांगितले. नियमित वर्ग सकाळी 8.00 वाजता पासून सुरू होत असल्याने सर्व प्राध्यापकांनी सकाळी 8.00 च्या पूर्वी महाविद्यालयात हजर राहून शिस्तीचे पालन करावे अशा सूचना दिल्या।

<u>विषय क्र. 2</u> :→ त्यांनतरच्या विषयाप्रमाणे वेळापत्रका बाबत चर्चा करण्यात आली वेळापत्रकातील प्रथम चार तासीका सकाळी 8.00 ते 11.40 या दरम्यान घेण्यात येतील असे सर्वानुमते ठरले.

<u>विषय क्र. 3</u> :→ त्यानंतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात हजर राहण्याची सक्ती करण्यात येणार नाही व जर वर्गामध्ये 50 %. पेक्षा अधिक संख्येने विद्यार्थी उपस्थित राहात असल्यास प्राचार्यांना तसे सुचवावे जेणेकरून विद्यार्थिनीचे दोन गट तयार करण्याचा निर्णय घेता येईल. त्यानुसार एक दिवसाआड विद्यार्थिनीना बोलविण्यावर विचार करता येईल असे सुचित करण्यात आले.

विषय क्र० ४ :- यानंतर प्राचार्यांनी वर्ग सुरू झाल्यानंतर विद्यार्थिनींनी घ्यावयाच्या आरोग्यविषयक दक्षता संबंधी सर्व सूचना विद्यार्थिनींना व्हाट्स ॲप ग्रुपवर देण्यात येतील तसेच त्या सूचना महाविद्यालयातील सूचना फलकावर लावण्यात येतील असे सांगितले सर्व प्राध्यापकांनी महाविद्यालयीन वेळेत विद्यार्थिनींद्वारे आरोग्य विषयक संपूर्ण खबरदारी घेतली जाते किंवा नाही याबाबत लक्ष ठेवून सर्व प्राध्यापकांनी सहकार्य करावे असे आव्हान केले.

विषय क्र. ५ :- सर्व प्राध्यापकांनी अटेंडन्स रजिस्टर तयार करावे व पूर्वीच सूचित केल्याप्रमाणे डेली डायरी मध्ये दररोज शिकविलेल्या भागाची नोंद घेवून प्रत्येक शनिवारला डेली डायरी वर प्राचार्यांची स्वाक्षरी घ्यावी व महिन्याचे शेवटी हजेरी पत्रकावर प्राचार्यांची स्वाक्षरी घ्यावी अशी सूचना प्राचार्यांनी दिली.

विषय क्र. ६ :- या विषया अंतर्गत विविध विभागाच्या समन्वयक व सदस्यांना त्यांच्याकडे देण्यात आलेल्या सत्र - २०२०-२०२१ मधिल कामे पूर्ण करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या त्या खालील प्रमाणे.

* डॉ. कापशीकर यांना स्टूडंन्स मेन्टरींग प्रोग्रामची जबाबदारी देण्यात आली.
* झालेल्या प्रत्येक युनिटवर घटक-चाचणी परिक्षा घेवून त्याचे रेकार्ड्स सर्व प्राध्यापकांनी प्राचार्यांच्या सहिनिशी ठेवावे.
* स्लो-लर्नर्स आणि ॲडव्हॉन्स लर्नर्स यांच्या याद्या तयार करून सर्व प्राध्यापकांनी त्यांच्या करीता संबधीत विभागाने केलेल्या कार्याचा आढावा तयार करून प्राचार्यांकडून प्रमाणित करून घेणे
* डिपार्टमेन्टल ॲकेडेमीक कॅलेन्डर तयार करण्याक सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात आले तसेच दोन्ही सेमिस्टर करीता टिचिंग प्लॅन, टिचींग मेथड्स, तसेच वर्गामध्ये P.P.T-चा वापर या नॅक करिता आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता करुन त्या संदर्भात संपूर्ण अहवाल प्राचार्यांना वेळोवेळी सादर करावा

* सर्व प्राध्यापकांनी आपल्या विषयाचे गेस्ट लेक्चर व सिरीज आयोजित करावे असे सूचित करण्यात आले.

* युनिट प्रमाणे युनिट टेस्ट मध्ये मिळालेल्या गुणांचे रेकॉर्ड्स व प्रश्नपत्रिका व्यवस्थित फाईलमध्ये लावून ठेवाव्या

* आपल्या विषयातील मेरीट विद्यार्थ्यांची यादी त्यांचे फोटोग्राफ्स तसेच आपल्या विषयाशी संबंधित आपण राबवित असलेल्या बेस्ट प्राक्टीसेसचे संपूर्ण रेकार्ड आपल्याकडे ठेवावा. अशा सूचना देण्यात आल्या.

* आपल्या विभागाला महाविद्यालयाच्या वेबसाईटवर अद्ययावत अभ्यास विषयक माहिती टाकून अद्ययावत करावे जेणे करून विद्यार्थी आधुनिक काळात डिजीटल रिसोर्सेसचा वापर करीत असल्याने त्यांना त्याचा अधिक लाभ होईल अशी सूचना प्राचार्यांनी प्राध्यापकांना दिली. तसेच व्हॉट्स ॲप ग्रुपचा वापर करून जर शिक्षक इंटरनेटच्या माध्यमातून स्टडी मटेरीयल विद्यार्थ्यांना देत असेल किंवा त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे नियमित मूल्यांकन करीत असेल तर त्याचे रेकार्ड्स ठेवावे. अशा सूचना दिल्या.

* सर्व प्राध्यापकांनी व्हॅल्यू ॲडेड कोर्सेस, ब्रिज कोर्सेस व महाविद्यालयाचे ध्येय व उद्दिष्ट पूर्ण करण्याकरीता विभागाद्वारे करण्यात येणारे प्रयत्न व त्यासंबंधी कार्यक्रम वेळोवेळी घ्यावे व त्याचा रेकार्ड ठेवावा.

* डॉ. कटरे सर व डॉ. सोनवाने सर यांनी इन्डक्शन कार्यक्रम चार ते पाच दिवसात घ्यावे अश्या सूचना देण्यात आली कोड ऑफ कन्डक्ट विद्यार्थ्यांकरीता कार्यक्रम व आरोग्य विषयक जबाबदारीच्या संदर्भात कार्यक्रम डॉ. रावळेकर व डॉ पुनस्या मॅडम यांनी आयोजित करावे असे सूचित केले.

* N.S.S. विभागाद्वारे सभेचे आयोजन करून किमान 7 ते 8 कार्यक्रम घेण्यात यावे अश्या सूचना डॉ. सोनक, डॉ. पुनस्या यांना देण्यात आल्या तसेच जयंती व पुण्यतिथी, आइटरीच कार्यक्रम राष्ट्रीय मूल्यांवर आधारीत कार्यक्रम घेवून त्यांचे संपूर्ण रेकार्ड्स व्यवस्थितपणे लावून वर्षाचे शेवटी प्राचार्यांकडे द्यावे अश्या सूचना डॉ. सोनक यांना देण्यात आल्या.

* डॉ पुनस्या मॅडम यांना कमीत कमी सहा स्पोर्ट्स शिक्षण कार्यक्रम

विद्यार्थ्यांकरीता आयोजित करून त्याचा रेकार्ड व्यवस्थित ठेवून वर्षाच्या शेवटी प्राचार्यांकडून स्वाक्षरी घेवून आपल्याकडे ठेवावा तसेच त्यांना आवश्यक असलेले खेळाचे साहित्य त्यांना खरेदी करून देण्यात येईल त्याची यादी व बजेट त्यांनी प्राचार्यांकडे तातडीने सादर करावे व विद्यार्थिनींच्या विद्यापिठीय स्पर्धेत सहभाग नोंदवावा अश्या सूचना डॉ. छल्लिला पुनय्या यांना देण्यात आल्या.

* सांस्कृतिक स्पर्धा सांस्कृतिक विभागाद्वारे कमीत कमी 6 कार्यक्रम घेण्यात यावे असे त्या विभागाचे समन्वयक डॉ. सोनक यांना सूचित करण्यात आले.

* फीड बॅक संपूर्ण जबाबदारी डॉ. रावळेकर यांना देण्यात आली.

* विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने विद्यार्थि विकास निधीचे वितरण करणे तसेच सर्व प्राध्यापकांकडून आर्थिक सहकार्य मिळावे या दृष्टीने सूचना करण्यात आली व त्याची जबाबदारी डॉ सोनक यांच्याकडे देण्यात आली.

* यशोधन वार्षिकांक डॉ. कापशीकर यांनी वेळेत पूर्ण करावा अश्या त्यांना सूचना देण्यात आल्या.

* महिला अध्ययन व सेवा केंद्राद्वारे जेन्डर इक्वीटी कार्यक्रम विविध समाजसेवी संस्था तसेच ओरलवा फाऊन्डेशन व बॅन्ड वाराहाते यांचे मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन डॉ. पुनय्या यांनी करावे व त्याकरिता डॉ. राऊत सरांचे सहकार्य घ्यावे अशी सूचना देण्यात आली.

* प्रत्येक M.O.U. च्या समन्वयकांने त्याअंतर्गत एक तेदोन कार्यक्रमाचे आयोजन करून त्याचे संपूर्ण रेकार्डस् ठेवावे अश्या सूचना देण्यात आल्या.

* माजी विद्यार्थी संघटनेच्या दोन सभा डॉ. रावळेकर यांनी आयोजित कराव्या तसेच पालक शिक्षक सभेचे (कमीत कमी दोन) आयोजन डॉ. सोनक यांनी करावे त्याचे संपूर्ण रेकार्डस ठेवण्यास सांगण्यात आले.

* यशोदा नॉलेज सिरीज संबंधी संपूर्ण जबाबदारी डॉ. कापशीकर यांच्याकडे देण्यात येवून त्यामध्ये विद्यार्थिनींच्या सहभाग त्यांनी नोंदवावा व महाविद्यालयाद्वारे राबविण्यात येणारी बेस्ट प्रॅक्टीस म्हणून त्याचे रेकार्डस् ठेवावे अशी सूचना करण्यात आली.

* बेस्ट प्राक्टीस 1 ची जबाबदारी डॉ फंरीश यांचेकडे व बेस्ट प्रॅक्टीस् 2 ची जबाबदारी डॉ. थूल यांचेकडे देण्यात आली. त्यांनी त्यासंदर्भात कार्यक्रम वोर्षिभरात राबवून त्याच्या संपूर्ण रेकार्ड ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या

* फॅकल्टी एक्सेलन्स कार्यक्रम तीन महाविद्यालयासोबत संपूर्ण शिक्षकांच्या सहभागाने राबविण्याची व त्याचे संपूर्ण रेकार्डस् व्यवस्थित पणे ठेवण्याची जबाबदारी डॉ. फटिंग यांना देण्यात आली.

* विद्यार्थि एक्सेलन्स कार्यक्रमाची जबाबदारी डॉ. सांबारे व डॉ कटरे यांचेकडे देण्यात आली व त्यांनी किमान तीन कार्यक्रम राबवावे असे सूचित करण्यात आले.

* बॅक व्हिजीटर्स कार्यक्रम डॉ. कटरे, व वाणिज्य शिक्षक यवतमाळ येथील श्री. कुळकर्णी (C.A.) यांचेशी केलेल्या M.O.U अंतर्गत कार्यक्रम व व्हिजीटस् च्या जबाबदारी देण्यात आली

* डॉ. रावकेकर यांना महाविद्यालयातील संपूर्ण कार्यक्रमाच्या वालक्या वृत्तपत्रामध्ये न चुकता देण्या संदर्भात जबाबदारी देण्यात आली. व कार्यक्रमाचे ठळक मुद्दे कार्यक्रम आयोजित करणाऱ्या शिक्षकांनी रावकेकर यांना द्यावे असे सर्वांना सूचित करण्यात आले.

* डॉ. के. जी. मेश्राम यांना प्रोफेशनल ट्रेनींग शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरीता प्रत्येकी दोन कार्यक्रम आयोजित करण्याची जबाबदारी देण्यात आली.

* डॉ. राहुल, व, डॉ. पुनम्या यांना अॅन्टी सेक्सुअल हरॅशमेंट समिती एस.टी. रॅगींग कमिटी, इंटरनल कम्प्लेन्ट कमीटी, व तक्रार निवारण समीती च्या सभा आयोजित करून प्रत्येक (वार्षीक 2) त्याचे संपूर्ण रेकार्डस् प्राचार्यांकडून स्वाक्षरीनिशी तयार करण्यास सांगण्यात आले.

* स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन संदर्भात किमान पांच कार्यक्रम श्री कापसेकर यांनी घ्यावे व त्याचे संपूर्ण रेकार्ड ठेवावे अशी त्यांना सूचना करण्यात आली.

* डॉ कटरे यांना प्लेसमेंन्ट सेल अंतर्गत किमान तीन कार्यक्रम घेवून प्लेसमेन्ट ड्राइव्ह आयोजित करण्यास सूचित करण्यात आले.

* विद्यार्थी परिषदेच्या सभा आयोजित करण्याच व त्याचे अहवाल ठेवण्यास डॉ. सांबारे व डॉ. कटरे यांना सांगण्यात आले.

* पर्यावरण विषयक कार्यक्रम डॉ. पूनम्या व डॉ. सांबारे यांना देण्यात आले. सर्व प्राध्यापकांना परीक्षाप्रमाणे संपूर्ण जबाबदाऱ्या ~~वरील~~ पूर्वीप्रमाणे देण्यात आल्या.

<u>इतर विषय</u> :->

सभेच्या शेवटी सर्व विषयांवर चर्चा झाल्यामुळे प्राचार्यांनी सर्व प्राध्यापकांना महाविद्यालयात वर्ग सुरू होत असल्याने आपल्या व आपल्या कुटुंबाच्या तसेच विद्यार्थिनींच्या हिताच्या दृष्टीकोनातून स्वेच्छेने कोरोना चाचणी करून घ्यावी असे सूचित केले तसेच महाविद्यालयीन शिस्ती बाबत कुणाचीही गय केली जाणार नाही अशी सूचना केली.

चहा पाना नंतर सभा सभा संपली प्राचार्यांनी जाहीर केले.

<u>सभेला खालील प्रमाणे प्राध्यापकांची उपस्थिती होती.</u>

स्वाक्षरी
[signature]
PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce
College, Nagpur

| प्राध्यापकांची नावे | स्वाक्षरी |
| --- | --- |
| ① अमोल राऊत | [signature] 16/2/2021 |
| ② डॉ गोविंद ना. राखुंडे | [signature] 16/2/2021 |
| ③ डॉ शरद सांबारे | [signature] 16/2/2021 |
| ④ K.G. Meshram | [signature] |
| ⑤ M.D. Katre | [signature] |
| ⑥ S.S. Thool [signature] | [signature] |
| ⑦ Suryakant Kapshikar | [signature] |

Page No.: 17
Date: 31/03/21

## सूचना

सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की, आज दिनांक 31/03/2021 बुधवार रोजी दुपारी 12.00 वाजता प्राचार्य कक्षामध्ये सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व प्राध्यापक पदांना अशी विनंती आहे की त्यांनी वेळेवर सभेला उपस्थित राहावे.

धन्यवाद.

सभेचे विषय :- (1) रजिस्टर पुस्तिका, डेली डायरी, घटक चाचणी परिक्षा यावर चर्चा करणे.
(2) नॅक विषयक चर्चा करणे.
(3) वर्षभर झालेल्या ऑनलाईन सांस्कृतिक कार्यक्रमासंबंधी चर्चा करणे.
(4) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय.

Principal
[Stamp illegible]

उपस्थित महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्गाच्या सह्या

1. Sharad Sambar [signature]
2. Dr. Govind N. Kumbha [signature]
3. Dr. Prakash S. Sonak [signature]
4. Dr. Pramod Fating [signature]
5. K. G. Meshram [signature]
6. M. D. Katre [signature]
7. Amol Raut [signature]

# 2020-2021 Academic Review and Planning Staff meeting dated 31-3-2021

## अहवाल

दिनांक 31/03/2021 रोजी (टीचर कौन्सीलच्या) सभेचे आयोजन करण्यात आले वरील सभा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनराज बोटे सर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली वरील सभेमध्ये वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

मुद्दा क्र. 1 हजेरी पुस्तिका, डेली नोटस्, घटक चाचणी परिक्षा या तीनही मुद्द्यावर चर्चा करण्यात आली तेव्हा प्राध्यापकांनी हजेरी पुस्तिका महाविद्यालयाला दिलेल्या आहेत. तसेच डेली नोटस्च्या वह्या देखील महाविद्यालयाला दिलेल्या असून सर्वांनी आपआपल्या विषयाच्या घटक चाचणी परिक्षा घेतलेल्या असून त्याचा निकाल तयार केलेला आहे अशी माहिती दिली

मुद्दा क्र. 2 नॅक विषयक चर्चा प्रत्येक विषयवार विभागाकडे देण्यात आलेल्या कामाच्या आढावा घेण्यात आला तेव्हा सर्वच विभागाने आपली कामे पूर्ण केलीत असे प्राध्यापकांनी सांगितले आणि विषयाशी संबंधित काम देखील पूर्ण केले असे सूचविले तेव्हा वरील विषयाला अध्यक्षांनी मान्य केले.

मुद्दा क्र. 3 सर्वच विषयवार विभागाच्या प्राध्यापकांना आपला घेतलेल्या ऑन लाईन घेतलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाबद्दल माहिती प्राचार्यांनी विचारली त्यावर सर्व प्राध्यापकांनी आपला रेकॉर्ड फोटोसह तयार केलेला आहे. असे प्राचार्यांना सांगितले तेव्हा वरील मुद्द्यावर सविस्तर चर्चा करून वरील मुद्द्याला मान्यता देण्यात आली.

मुद्दा क्र. 4 अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय नसल्यामुळे अध्यक्षांनी सभा समाप्त झाल्याची घोषणा केली.

SEAL

Principal
[illegible] Girls Arts & Commerce
College, [illegible] Nagar, Nagpur-15

# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Staff Council Meeting Register

## Review Meetings for Teaching, Learning and Evaluation process in the Institution

## Academic Session: 2021-2022

# 2021-2022 Academic Review meeting dated 31-03-2022

Page No.: 14

सूचना

दि० 31/03/2022

सर्व प्राध्यापकांना सूचित करण्यात येते की, आज दिनांक 31/03/2022 शुक्रवार रोजी दुपारी 12.30 वाजता प्राचार्य कक्षामध्ये सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्व प्राध्यापकांनी सभेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

सभेतील विषय :-

1. सर्व विषयाच्या विषयवार अभ्यासक्रमाचा आढावा
2. हजेरी पुस्तिका, डेली डायरी, आणि घटक चाचणी परिक्षा
3. शार्ट टर्म कोर्स विषयक चर्चा करणे
4. नॅक विषयक चर्चा करणे
5. सांस्कृतिक कार्यक्रम विषयक चर्चा करणे.
6. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15

सर्व प्राध्यापक वर्गाच्या सह्या :

1. Dr. Govind N. Rathod
2. Lalita Punnyani
3. Wahajuddin Ahmad
4. M. D. Katre
5. S. M. Kapshikar
6. Amol Raut 31/3/22
7. Dr. Rekha Y. Zoting 31-3-2022
8. Dr. P. G. Pating
9. S. P. Sonbai
10. Nidhi Nakhale
11. K. G. Meshram
12. R. B. Ghogre
13.
14.
15.
16.
17.
18.
19.
20.

S. S. Thool

SEAL

# अहवाल

Page No.:
Date 31 / 03 / 22

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्गाची सभा दिनांक 31/03/22 रोजी प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेमध्ये खालील सर्व विषयावर चर्चा करण्यात आली:

**मुद्दा क्र. 01** :→ वरील विषयाच्या अनुषंगाने प्रत्येक प्राध्यापकांनी 50 मुलींना फोन करणे मुली कमी येत असून त्यांना महाविद्यालयामध्ये येण्यासंदर्भात प्रयत्न करून ज्यांचे कोर्स झालेत त्यांनी असायमेंट देणे, सर्व प्राध्यापकांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण करणे निकाल चांगला लागावा याकरिता अधिक प्रयत्न करणे द्वितीय घटक चाचणी आणि सराव परिक्षा घेणे असे अध्यक्षांनी सर्व प्राध्यापकांना सूचना केल्या.

**मुद्दा क्र. 02** :→ वरील विषयाच्या अनुषंगाने सर्वांनी आपल्या हजेरी पुस्तिका दिनांक 05/04/22 पर्यंत तयार करून प्राचार्यांची सही घ्यावी तसेच डेली डायरीवर देखील सह्या घ्याव्या संपूर्ण तयार केलेल्या विषयवार आणि इतर कार्याशी संबंधीत पेपरवर प्राचार्यांची सही लवकरात लवकर घेवून आपला सर्व रेकार्ड पूर्ण करावा अशी सूचना अध्यक्षांनी केली.

**मुद्दा क्र. 03** :→ सर्वच प्राध्यापकांनी शार्ट टर्म कोर्स घेतलेले आहेत याची माहिती भरल आहे परंतु आणखी ते घेण्यात यावेत असे अध्यक्षांनी सूचविले त्यावर प्राध्यापकांनी पुढील शार्ट टर्म कोर्सची तयारी करावी असे सांगितले.

**मुद्दा क्र. 4** :→ वरील विषयाच्या अनुषंगाने असे सर्वानुमते अध्यक्षांच्या परवानगीनुसार एक दिवसाचे सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्यानुसार वर्षभर महाविद्यालयातर्फे आणि विषय विभागातर्फे जे कार्यक्रम आणि स्पर्धा घेण्यात आल्यात त्यांची बक्षिसाचे वितरण करणे विद्यार्थिनिंकरू सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता तयार करणे नाटक आणि इतर डॉन्स स्पर्धेचे आयोजन करणे आणि कार्यक्रमाच्या शेवटी स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 13/04/2022 रोजी घेण्याचे अध्यक्षांनी सूचविले त्यानुसार सर्व प्राध्यापकांनी याला होकार दिला वरील कार्यक्रमाचे आयोजन उद्या दिनांक 1/4/2022 पासून सुरू करावे असे सूचविण्यात आले.

**मुद्दा क्र. 05** :→ अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या विषयामध्ये कोणतेही विषय नसल्यामुळे अध्यक्षांनी सभा समाप्त करण्यात येत आहे असे घोषीत केले.

SEAL

(signature)

Principal
Yashoda Girls Arts & Commerce College, Bhoh Nagar, Nagpur-15

**2021-2022 Academic Review and Academic planning meeting with Staff Dated 06-05-2022**

Page No.: 14
Date: 02/05/22

## सूचना

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्गाला सूचित करण्यात येते की टिचर कौन्सीलची सभा दि० 06/05/2022 रोजी सकाळी 12.00 वाजता प्राचार्य कक्षामध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. वरील सभेमध्ये काही महत्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात येणार असून सर्व प्राध्यापकांनी परीक्षा सभेला उपस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. याची सर्व प्राध्यापकांनी नोंद घ्यावी.

धन्यवाद

SEAL

Principal
[illegible] Girls Arts & Commerce College, [illegible] Nagar, Nagpur-15

सभेचे विषय :-

1. उन्हाळी सुट्यामध्ये बँक विषयक कामासंदर्भात प्राध्यापकांची उपस्थिती.
2. विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या संदर्भात कोर्सचा आढावा.
3. प्रवेश संदर्भात चर्चा.
4. अध्यक्षाच्या अनुमतीने येणारे विषय

सर्व प्राध्यापक वर्गाच्या सह्या.

1. K. G. Meshram — [signature]
2. M. D. Katre — [signature]
3. P. G. Pating — [signature]
4. Dr. Govind N. Rawlekar — [signature]
5. Dr. Shared Sambare — [signature]
6. Rajesh Ghogre — R. B. Ghogre
7. Amol Raut — [signature]
8. S. S. Theol — [signature]
9. Lalita Punnya — [signature]
10.
11.
12.
13.
14.
15.